दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडव्हेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०१ ले • अंक ३६९ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार दि.२२ ऑक्टोबर २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

### मविआ,महायुतीला तगडं आव्हान

# परिवर्तन महाशक्ती आघाडीकडून १० उमेदवारांची पहिली यादी जाहीर

**:: उमेदवारांची यादी ::**

- अचलपूर – बच्चू कडू – प्रहार जनशक्ती पक्ष
- रावेर यावल – अनिल चौधरी – प्रहार जनशक्ती पक्ष
- गणेश निंबाळकर – चांदवड – प्रहार जनशक्ती पक्ष
- सुभाष साबणे – देगलूर – प्रहार जनशक्ती पक्ष
- अंकुश कदम – एरोली – महाराष्ट्र स्वराज्य पक्ष
- माधव देवसरकर – हदगाव हिमायतनगर – महाराष्ट्र स्वराज्य पक्ष
- गोविंदराव भवर – हिंगोली – महाराष्ट्र राज्य समिती
- वामनराव चटप – राजुरा – स्वतंत्र भारत पक्ष
- शिरोळ – स्वाभिमानी शेतकरी संघटना
- मिरज – स्वाभिमानी शेतकरी संघटना



**मुंबई (वृत्तसंस्था)**

परिवर्तन महाशक्तीची पहिली यादी आज जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये ८ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. तर सांगली जिल्ह्यातील शिरोळ व मिरज या दोन मतदारसंघात राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उमेदवार उद्या जाहीर करण्यात येणार आहेत. परिवर्तन महाशक्ती आघाडीची पत्रकार परिषद सोमवारी पार पडली. यावेळी तिसऱ्या आघाडीच्या वतीने पहिली यादी जाहीर करण्यात आली. महायुती आणि महाविकास आघाडी तुटणार, असा दावा बच्चू कडू यांनी यावेळी केला.

आमच्या आघाडीला तिसरी म्हणणारे आता तिसऱ्यात जाण्याची शक्यता आहे आणि आम्ही पहिल्यात राहणार आहोत, असाही दावा बच्चू कडू यांनी केला. महाविकास आघाडीमध्ये कशाप्रकारचे वातावरण आहे, हे मला आहे. त्यामुळे आघाडी एकत्र राहू शकणार नाही. मुश्किलीने राहिली जरी तर बरेच उमेदवार हे आघाडीतील पाडले जातील. त्यासंदर्भातील बरेच फोन आमच्याकडे आले आहे. ४ नोव्हेंबरला मोठा स्फोट होईल, असेही बच्चू कडू म्हणाले.

परिवर्तन महाशक्तीच्या माध्यमातून एक सशक्त आणि दणकट पर्याय महाराष्ट्रातील जनतेसमोर ठेवत आहोत. महाराष्ट्रात आज राजकारण नाही तर राजकारणातील टोळी युद्ध सुरू आहे. आम्हाला हा महाराष्ट्र स्वच्छ करायचा आहे. महाराष्ट्राची लयाला गेलेली राजकीय संस्कृती, राजकीय प्रगल्भता ती पुन्हा आणण्याचा निर्धार परिवर्तन महाशक्तीने केला आहे.

### आम्हाला चांगला प्रतिसाद – संभाजी राजे

सत्ताधारी आणि विरोधक दोघांनी सत्ता भोगली आहे. मात्र आजही आपण केवळ मूलभूत प्रश्नांवरच चर्चा करत आहोत. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राकडे लाँग टर्म व्हिजन बॉन्ड प्रोग्राम पहायला मिळत नाही. त्यामुळेच परिवर्तन महाशक्ती आघाडीची निर्मिती करण्यात आली आहे. १०–१५ परिवर्तन महाशक्तीला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. चांगल्या उमेदवार आमच्या दररोज संपर्कात आहेत. टप्प्याटप्प्याने आम्ही उमेदवार जाहीर करणार आहोत, असे संभाजी राजे म्हणाले.

### मविआ, महायुती तुटणार – बच्चू कडू

परिवर्तन महाशक्ती आघाडी विधानसभा निवडणूक लढवणार ही नाही, असे अनेकांना वाटत होते. पण आता आम्ही नावे जाहीर करत आहोत. आम्ही इतर पक्षांसारखे वेगवेगळे नावे जाहीर न करता एकत्र करत आहोत. भविष्यात आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता आहे. त्यातील एक पक्ष फुटून बाहेर निघणार आहे. तर महायुतीतील एक मित्र बाहेर जाणार असल्याचे आमच्या कानापर्यंत आले आहे, असा दावा आमदार बच्चू कडू यांनी केला.

## वर्धा जिल्ह्यात दारूबंदी फक्त नावालाच;प्रशासनाची निष्क्रियता उघड

**वर्धा | प्रतिनिधी**

महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या पवित्र भूमीत दारूबंदी फक्त कागदावरच उरली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात गांधीजींनी सेवाग्राममधून अनेक आंदोलनांचे नेतृत्व केले, तर विनोबा भावे यांनी भूदान चळवळ राबवली. या महापुरुषांच्या कार्याचा सन्मान राखण्यासाठी १९७४ साली वर्धा जिल्ह्यात दारूबंदी लागू करण्यात आली. मात्र, प्रत्यक्षात ही दारूबंदी फसवी ठरत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

पोलीस आणि उत्पादन शुल्क विभागाने कारवाईचे दावे केले तरी जिल्ह्यात खुलेआम दारू विक्री सुरूच आहे. नागपूर, यवतमाळ, चंद्रपूर आणि अमरावती या शेजारील जिल्ह्यांमधून मोठ्या प्रमाणावर दारूचा पुरवठा होतो. काही व्यापारी थेट मध्य प्रदेशातून विदेशी आणि हलक्या दर्जाची दारू आणून विक्री करत असल्याने बनावट दारूचा धोका वाढला आहे.



पोलिसांनी काही वेळा लाखोंचा दारू साठा जप्त केल्याचे दाखवले असले तरी विक्री पुन्हा सुरू होते. स्थानिक पोलिसांनाही या व्यापाराची माहिती असूनही कठोर पावले उचलली जात नाहीत. या निष्क्रियतेमुळे विक्रेत्यांचे धाडस वाढत आहे आणि गैरव्यवहार बिनधास्त सुरू आहेत.

वर्धा शहरात अनेक विक्रेते फोनवरून मागणी स्वीकारून दारूची घरपोच डिलिव्हरी देत आहेत. काही ठिकाणी थेट बारप्रमाणे ग्राहकांना सेवा दिली जात आहे, आणि प्रशासनाचे लक्ष याकडे नसल्याने ही परिस्थिती अधिक गंभीर होत आहे.

सध्या निवडणुकीचा हंगाम सुरू असल्याने दारू विक्रीत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नव्या पोलिस अधीक्षकांनी तातडीने कारवाई करण्याची गरज आहे. दारूबंदीचे कडक पालन न केल्यास जिल्ह्यात सामाजिक आणि आरोग्यविषयक समस्या अधिक बळावू शकतात. वर्धा जिल्ह्यात दारूबंदीचे फक्त दिखावाच उरल्याचे वास्तव समोर येत आहे. या संकटावर वेळीच नियंत्रण न मिळविल्यास जिल्ह्याचा सामाजिक आरोग्य आणि सुरक्षिततेवर गंभीर परिणाम होईल. त्यामुळे प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करणे आणि दारूबंदीचे पालन होण्यासाठी ठोस उपाययोजना राबवणे अत्यंत आवश्यक आहे.

## वैजापूरमध्ये दोन दुर्दैवी घटना: विहिरीत बुडून युवकाचा आणि रेल्वेतून पडून महिलेचा मृत्यू

**वैजापूर | अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यात दोन दुर्दैवी घटना घडल्यामुळे हळहळ व्यक्त केली जात आहे. बिलोणी येथे १७ वर्षीय युवकाचा विहिरीत बुडून मृत्यू झाला, तर परसोडा-रोटेगाव रेल्वेमार्गावरून पडल्यामुळे एका महिलेचा मृत्यू झाला आहे.

बिलोणी गावातील विकास राजेंद्र कदम (वय १७) हा मित्रासोबत पोहण्यासाठी विहिरीत उतरला होता. पाण्याचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला. त्याच्या मित्राने गावकऱ्यांना कळविल्यानंतर ग्रामस्थांनी धाव घेत त्याला बाहेर काढले. विकासला शिऊर प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले, परंतु उपचारांपूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

शिऊर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून, या घटनेचा तपास पोलीस अमलदार राहुल थोरात करत आहेत.



दुसऱ्या घटनेत,परसोडा ते रोटेगाव दरम्यान एका अनोळखी महिलेचा (वय अंदाजे ५० वर्षे) रेल्वेतून पडल्याने मृत्यू झाला. घटनेची माहिती रेल्वे ट्रॉलीमन आशिष सोनवणे यांनी दिली. महिलेचा मृतदेह **वैजापूर उपजिल्हा रुग्णालयात* पाठवण्यात आला असून ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या प्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या दोन्ही घटनांमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून संबंधित कुटुंबांवर शोककळा पसरली आहे.

## ठाकरे गटात आर्थिक देवाण घेवाण करत तिकीट वाटप

### निष्ठावानांना डावलून बाहेरुन आलेल्यांना संधी–संजय शिरसाट

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**–ठाकरे गटात आर्थिक देवाण-घेवाण करुन उमेदवारी दिली. निष्ठावानांना डावलून बाहेरुन आलेल्यांना उमेदवारी दिल्याचा आरोप शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी केला आहे. तुमच्याकडे आले तर ते निष्ठावान आणि दुसऱ्या पक्षात गेले तर गद्दार असताात का असा सवालही शिरसाट यांनी उपस्थित केला आहे.

संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, शिवबंधन बांधले, एबी फॉर्म दिला आणि निवडणुकीला लागा हे सर्व प्रकार पैशा शिवाय होत नाही. यात निश्चितच पैशाची देवाण-घेवाण झाली आहे.

उबाठाला असे वाटत होते की आमच्यामुळे इतर पक्ष चालत आहेत, त्यांना काँग्रेसने चांगली चपराक दिली आहे. माईक खेचाताणीपर्यंत त्यांचा प्रकार गेला आहे. शिवसेना प्रमुखांनी तयार केलेल्या नेत्यांची अशी अवस्था काल महाराष्ट्राने अनुभवली म्हणत शिंदेंचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी ठाकरे गटावर निशाणा साधला आहे. संजय शिरसाट पुढे बोलताना म्हणाले की, काँग्रेस-राष्ट्रवादीसोबत युती करू नका आम्ही सांगायचो, त्यांच्याबरोबर युती केल्यावर काय परिणाम होतात. तुमच्या पत्रकार परिषदेत तुम्हाला कसे सुनावले जाते. तुटेपर्यंत ताणू नका हे सांगितले जाते ही नामुष्मीची वेळ त्यांच्यावर आली आहे.संजय शिरसाट म्हणाले की, महायुतीत मुख्यमंत्रीपदाच्या नावाची चर्चा नाही. अब्दुल सत्तार यांनी मुख्यमंत्रीपदाबाबत केलेले वक्तव्य हे त्यांचे वक्तव्य आहे. मी पक्षाचा प्रवक्ता म्हणून सांगतो की महायुतीमध्ये मुख्चयमंत्रीपदाबाबत काही ठरलेले नाही. ही निवडणूक एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात लढली जाणार हे फिक्स झाले आहे. मुख्यमंत्रीपदाबाबत निवडणुकरनंतर ठरणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. तर प्रत्येकाला आपला नेता हा मुख्यमंत्री व्हावा असे वाटते, मलाही एकनाथ शिंदेंनी पुन्हा मुख्यमंत्री व्हावे असे वाटते पण त्यावर आमची काहीच चर्चा झाली नाही. निवडणुकरानंतर मुख्यमंत्रीपदा बाबत ठरेल असे शिरसाट यांनी स्पष्ट केले.

## उमेदवारी जाहीर झाल्यावर चंद्रकांत पाटील म्हातोबाच्या चरणी लीन

**पुणे (वृत्तसंस्था)**–विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष महायुतीचे उमेदवार चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर कोथरुडचे ग्रामदैवत म्हातोबाचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. त्यानंतर शिवतीर्थावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन केले. यावेळी भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेससह महायुतीतील सर्व घटक पक्षातील कार्यकर्त्यांनी जल्लोष करत पाटील यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, रिपाइंचे ड. मंदार जोशी, भाजपा कोथरूड दक्षिण अध्यक्ष डॉ संदीप बुटाला, उत्तरचे अध्यक्ष सचिन पाषाणकर, प्रदेश प्रवक्ते संदीप खर्डेकर, पुनीत जोशी, गणेश कळमकर, सुशील मेंगडे, गिरीश भेलके, लहू बालवडकर, प्रल्हाद सायकर, महिला मोर्चाच्या अध्यक्षा कांचन कुंबरे यांच्या सह भाजपचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी चंद्रकांत पाटील म्हणाले की, भारतीय जनता पक्षाने माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला मी नेहमीच पात्र राहत आलो आहे. मला उमेदवारी दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शाह, जे. पी. नड्डा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सह सर्वांचे मनापासून आभार मानतो. कोथरूड विधानसभा मतदारसंघामधील सर्व मतदारांनी भारतीय जनता पक्ष महायुतीवर नेहमीच भरभरून प्रेम केले आहे. लोकसभा निवडणुकीत कोथरुड विधानसभा मतदारसंघातून केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांना ७५ हजारांपेक्षा जास्त मताधिक्य मिळाले. यासाठी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कठोर परिश्रम घेतले. विधानसभा निवडणुकीत ही कोथरूडची जनता भारतीय जनता पक्ष महायुतीला भरभरून आशीर्वाद देतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले की, आपल्या पक्ष नेतृत्वाने चंद्रकांतदादा पाटील यांना उमेदवारी दिली आहे. त्यामुळे एक लाखाच्या मताधिक्याने दादांना विजयी करायचं आहे. आजपासून प्रत्येक मिनिट आपल्या सर्व कार्यकर्त्यांसाठी महत्वाचा आहे. भारतीय जनता पक्ष महायुयीचे सैन्य आपल्या सेनापतीला विजयी केल्याशिवाय राहणार नाही, असा विश्वास यावेळी व्यक्त केला.

## सीएम होण्याचे स्वप्न पाहणारे आमदार सुद्धा होऊ शकणार नाही विखेंची बाळासाहेब थोरातांवर टीका

**अहिल्यानगर | प्रतिनिधी**



मुख्यमंत्री होण्याचे स्वप्न पाहणारे, यंदा आमदार सुद्धा होऊ शकणार नाही, असे म्हणत भाजपचे माजी खासदार सुजय विखे पाटील यांनी काँग्रेस नेते बाळासाहेब थोरातांवर टीका केली आहे. तर दहशत झुगारून परिवर्तनासाठी ठेकेदारी संस्कृतीविरोधात युवकांनी उभे राहावे, असेही त्यांनी म्हटले आहे.

सुजय विखे पुढे बोलताना म्हणाले की, बाळासाहेब थोरात यांनी ४० वर्षे तालुक्यात फक्त नातेवाईकांसाठी राजकारण केले असा आरोप त्यांनी केला आहे. तर वर्षानुवर्ष या भागातील महिलांच्या डोक्यावरील हांडा उतरवू न शकलेले कोणत्या विकासाची भाषा करतात?असा सवाल विखेंनी संगमनेर मतदारसंघात युवा संकल्प मेळाव्यात उपस्थित केला.

काही दिवसांपूर्वी सुजय विखे म्हणाले की, मला संगमनेरमधूनच विधानसभा निवडणूक लढवायला आवडेल. इतर मतदारसंघात नको. पक्षाने आदेश दिल्यास संगमनेरमधूनच उमेदवारी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. मी संगमनेरमधूनच विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक आहे,सुजय विखे म्हणाले की, सुजय विखे यांना या मतदारसंघात निवडणूक लढवण्याची इच्छा आहे. त्यासाठी त्यांनी तयारी सुरू केली आहे. दोन दिवसात पक्षाचा निर्णय होवून संगमनेर विधानसभा मतदार संघाची जागा भाजपच्या वाट्याला येईल, तळेगाव, निमोण भागातील तरुणांनी या मातीची शान राखून परिवर्तन केले. तसेच आता येणाऱ्या निवडणुकीतही करायचे असे त्यांनी म्हटले आहे.सुजय विखे म्हणाले की,चाळीस वर्षे तालुक्याला मोठी पद मिळाली. पण निधी आणता आला नाही. यांनी केवळ नाते ठेकेदार आणि जमिनीचा ताबा मिळवणारे याच गोष्टीवर पद वाटप केले असा आरोप त्यांनी केला. तर मंत्री राधाकृष्ण विखे यांच्या माध्यमातून तळेगावला ४४ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाल्याचेही त्यांनी म्हटले आहे.संगमनेरवर बाळासाहेब थोरातांचे सतत वर्चस्व १८५ पासून विधानसभा मतदारसंघावर माजी मंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांनी सतत वर्चस्व ठेवले आहे.सलग आठ वेळा ते विधानसभेत निवडून गेले. १९९५ ला मात्र वसंतराव गुंजाळ व त्यांच्यात अटीतटीची लढत झाली. हा एक अपवाद वगळता दरवेळी थोरात यांचे मताधिक्य वाढलेलेच आहे. मंचरच्या शकुंतला थोरात, बापूसाहेब गुळवे, अरुण इथापे, दिलीप शिंदे, बाबासाहेब कुटे, जनार्दन आहेर आदी उमेदवारांना त्यांनी पराभवाची धूळ चारली. प्रभावी प्रचार यंत्रणा कार्यकर्त्यांचा संच वडील सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात यांनी सहकारावर ठेवलेली मजबूत पकड याचा फायदा त्यांना प्रत्येक निवडणुकीत मिळत गेला. सर्व सहकारी संस्थांवर थोरात यांचे निर्विवाद वर्चस्व आहे.

# अहिल्यानगरचा शाश्वत विकास व्हावा यासाठी अहिल्यानगर विकास मंचाची स्थापना

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहिल्यानगरच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. आर्किटेक्टस् इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशनमधील सभासद व शहरातील प्रतिष्ठित व्यक्ती एकत्र येऊन जेएलपी टॉवर्स लिंक रोड, केडगाव येथे एक बैठक घेतली आणि अहिल्यानगर विकास मंचाची स्थापना केली.या मंचाद्वारे शहरातील विकासकामांची तपासणी केली जाईल. त्याचे अहवाल स्थानिक पत्रकारितेमध्ये प्रसिद्ध करून संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल. नवीन विकास योजनांचा अभ्यास करून आवश्यकतेनुसार बदल सुचवणे, नगर शहराच्या इतर शहरांशी कनेक्टिव्हिटीचा अभ्यास करून प्रोजेक्ट रिपोर्ट संबंधित अधिकाऱ्यांना सादर करणे, आणि शहराच्या पर्यटन वाढीसाठी उपाययोजना सुचवणे हे या मंचाचे उद्दिष्ट आहे.

शहरवासीयांच्या आर्थिक प्रगतीसाठी उपाययोजना तयार करून त्या शासकीय व लोकप्रतिनिधींमध्ये सादर करणे, सीना नदी विकास प्रकल्पाचा अभ्यास करून त्यावर कार्यवाही करणे, पिंपळगाव माळवी येथील तलाव व शासकीय जागेत पर्यटन क्षेत्र तयार करणे, तसेच भुईकोट किल्ल्याचा विकास यासारख्या अनेक बाबींसाठी या मंचाची स्थापना करण्यात आली आहे.या बैठकीत सर्वानुमते मंजूर झालेल्या ठरावांमध्ये शहरातील अतिक्रमण, रस्त्यांची दुरावस्था, आणि चालू विकास कामांचे ऑडिट याबाबत उपाययोजना करण्यात आल्या आहेत. आर्किटेक्टस् इंजिनिअर्स व सर्व्हेअर्स असोसिएशनचा उपक्रम म्हणून या मंचात सेवा निवृत्त अधिकारी, उद्योजक आणि शहरातील प्रतिष्ठित नागरिकांना विशेष निमंत्रित केले जाणार आहे, अशी माहिती मंचाचे आमंत्रक विजयकुमार पादीर यांनी दिली.



# मुलींना गर्भातच संपविण्याच्या पापाचा कायद्याने विनाश

**नागपूर । प्रतिनिधी**

महिलांना सन्मान देणाऱ्या आपल्या देशात मुलींना गर्भातच संपविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणावर घडतात. या घटनांवर आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने १९९४ मध्ये 'गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा' लागू केला. हा कायदा स्त्री-भ्रूणाचे संरक्षण करतो आणि लिंगनिदानावर कठोर निर्बंध घालतो. प्रसवपूर्व निदान तंत्राचा वापर केवळ गर्भातील विकृती शोधण्यासाठी करता येतो. लिंगनिदान करणे किंवा त्याची माहिती देणे गुन्हा आहे. कोणत्याही रुग्णालय, आरोग्य केंद्र किंवा प्रयोगशाळेत लिंगनिदान करता येत नाही. तसेच, गर्भवती महिलेला किंवा तिच्या कुटुंबीयांना बाळाच्या लिंगाची माहिती सांगण्यास बंदी आहे.



या कायद्यांतर्गत गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र असून, तडजोडीची मुभा नाही. दोषी ठरल्यास आरोपीस ३ ते ५ वर्षांपर्यंत सश्रम कारावास आणि १० हजार ते ५० हजार रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. दोषी डॉक्टर किंवा लॅबचे लायसन्स रद्द करण्याची तरतूद देखील आहे. कायद्याच्या अंमलबजावतीनंतर स्त्री-भ्रूणहत्येच्या घटनांमध्ये घट झाली आहे. मात्र, या प्रवृत्तीवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी कायद्याची काटेकोर अंमलबजावणी आणि जनजागृती करणे आवश्यक आहे.

# हदगाव पंचायत समिती कार्यालयात अग्नि मोहोळामुळे भीतीचे वातावरण, तातडीच्या उपाययोजनांची मागणी

**नांदेड । बालाजी पाटील**

हदगाव तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयात अनेक वर्षांपासून असलेल्या अग्नि मोहोळामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. रोजंदारी योजना, राशन कार्ड, आणि अन्य शासकीय कामांसाठी गावांतील नागरिकांना येथे यावे लागते. मात्र, या मोहोळामुळे दुर्घटनेची भीती व्यक्त होत असून तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी जनतेतून होत आहे. आचारसंहितेमुळे कर्मचाऱ्यांची टंचाई असताना अशी परिस्थिती गंभीर ठरत असल्याचे स्थानिकांनी सांगितले.

हदगाव तालुक्यातील १४६ गावांमधील नागरिकांना, विशेषतः महिला सदस्यांना पंचायत समिती कार्यालयात विविध कामांसाठी वारंवार येण्याची गरज भासते. मात्र, कार्यालयातील अग्नि मोहोळामुळे जनतेला सतत धोका जाणवत आहे. अचानक काही विपरीत घटना घडल्यास त्याची जबाबदारी कोणाची, असा प्रश्न लोकांमध्ये चर्चिला जात आहे.

सध्या निवडणुकीची आचारसंहिता लागू असल्यामुळे अनेक कर्मचारी तहसील कार्यालयात निवडणूक ड्युटीवर लावण्यात आले आहेत. त्यामुळे पंचायत समितीच्या कार्यालयात यंत्रणा अपुरी असल्याचे दिसत आहे. कार्यालयातील अग्नि मोहोळामुळे येथील कामकाज आणि नागरिकांच्या सुरक्षिततेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. अग्नि मोहोळाचा तातडीने बंदोबस्त करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी मागणी ग्रामपंचायतीच्या पदाधिकारी आणि नागरिकांकडून केली जात आहे. कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी आणि जनतेचा विश्वास टिकवण्या साठी त्वरीत उपाययोजना राबवण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



# देवीचा माळ येथील मूकबधिर शाळेला उपक्रमशील शाळा पुरस्कार प्रदान

**सोलापूर । प्रतिनिधी**

ओन्ली समाजसेवा बहुउद्देशीय संस्था, बार्शी यांच्या वतीने राज्यस्तरीय उपक्रमशील शाळा पुरस्कार २०२४ श्री जगदंबा कमला भवानी मूकबधिर निवासी विद्यालय, श्री देवीचा माळ, करमाळा यांना प्रदान करण्यात आला.

या शाळेची निवड विविध निकषांवर करण्यात आली आहे, ज्यामध्ये शाळेने राबविलेल्या उपक्रमांची यादी, विद्यार्थ्यांना पुरवल्या जाणाऱ्या सोयीसुविधा, सामाजिक कार्यातील योगदान, शाळेला मिळालेले विविध पुरस्कार, तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा समावेश आहे.




यावेळी आयुष्य व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्राचे डॉ. संदीप तांबारे, नगरपालिका शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी अनिल बनसोडे, संस्थेचे अध्यक्ष राहुल वाणी, अजित कुंकलोळ, डॉक्टर रामचंद्र जगताप यांसारख्या मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. संस्थेचे सचिव चित्रसेन पाथरूट सर, मुख्याध्यापक दत्तात्रय काळे, तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. या पुरस्काराबद्दल संत दामाजी अपंग सेवा मंडळ, मंगळवेढा संस्थेच्या अध्यक्षा सुशीला पाथरूट मॅडम, सचिव चित्रसेन पाथरूट सर व शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नागनाथ पाथरूट सर यांनी शाळेचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांना विशेष कौतुक केले.

# राज आदेश अंतिम राहिल; मनसेने कायमचं सर्वाजानिक हिताचीच मागणी केली–घोलप

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा माढा मतदारसंघातील आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) करमाळा तालुका व शहर यांच्या सर्व अंगीकृत संघटनांनी स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे पक्ष प्रमुख राजसाहेब ठाकरे यांचे आदेश अंतिम राहतील. संजय (बापु) घोलप, मनसे तालुकाध्यक्ष, म्हणाले की, मनसेने सदैव दिल्लीपासून गल्लीपर्यंत सर्व सामान्य जनतेच्या हिताची मागणी केली आहे.

आगामी विधानसभेत महाराष्ट्र नवनिर्माण सेना आपली ताकद दाखवून देईल. पक्ष स्थापनेपासून मनसे पदाधिकाऱ्यांनी सामान्य जनतेसाठी समाजसेवक म्हणून कार्य केले आहे. त्यांनी मताचा विचार न करता सदैव समाजासाठी काम केले आहे.



ज्यांनी मतदारसंघातील चांगले काम केले, त्यांचे कौतुक केले आणि ज्यांनी चुकीचे काम केले, त्यावर निर्भयपणे उघडपणे विरोध केला. आमचे पक्ष प्रमुख राजसाहेब ठाकरे यांच्या विचारावर काम करत आहोत, आणि हे काम करताना आमचे मनसे नेते दिलीप बापु धोत्रे आणि जिल्हाध्यक्ष प्रशांत गिड्डे यांचे मार्गदर्शन आम्हाला मिळत आहे. आम्ही राजसाहेब यांचे हात बळकट करण्यासाठी कार्यरत राहू, आणि त्यांनी हाक दिली तर उपस्थित राहू. करमाळा तालुक्यातील आणि शहरातील प्रत्येक नागरिकांच्या प्रश्नांवर आणि विविध सामाजिक घटकांवर मनसेची साथ कायम राहिली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत आमची ताकद स्पष्टपणे दिसून येईल, असे मत संजय घोलप यांनी व्यक्त केले.

# माजी आ.जगताप यांनी राष्ट्रवादीची उमेदवारी नाकारली,आता पुढील भूमिकेकडे लक्ष

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळ्याचे माजी आमदार जयवंतराव जगताप यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या करमाळा विधानसभेसाठी उमेदवारी देऊ केली होती. परंतु जगताप यांनी ती उमेदवारी नाकारली आहे, असे खात्रीलायक वृत्त समोर आले आहे.

अजित दादा समर्थक अपक्ष आमदार संजय मामा शिंदे यांनी पक्षाचे उमेदवारी घेणार नसल्याचे सांगितल्यानंतर पवार यांनी जगताप यांना मुंबईत भेटण्यासाठी बोलावले होते. यावेळी, पवार यांनी जगताप यांना करमाळा विधानसभेसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या निवडणुकीमध्ये सहभागी होण्यासाठी विचारणा केली. पवार यांनी लाडकी बहीण योजना आणि अंबालिका कारखान्याच्या समर्थनाबाबत जगताप यांना आश्वासन दिले होते.

तथापि, जगताप यांनी स्पष्टपणे सांगितले की, सध्याच्या केंद्र व राज्य शासनाबद्दल जनतेत तीव्र रोष आहे, आणि त्यामुळे ते जनतेच्या विचारांशी प्रतारणा करू शकत नाहीत. त्यांनी जनतेच्या खिशातून जीएसटी आणि अन्य



करांच्या माध्यमातून मिळणाऱ्या अनुदानाबद्दलही चिंता व्यक्त केली. जगताप यांनी अजित पवार यांना सुचवले की, आपल्या समर्थकांनी देखील उमेदवारी नाकारली आहे, त्यामुळे त्यांनी राजकीय रसद पुरवून देखील एकनिष्ठेने राहण्याबद्दल गांभीर्याने विचार करावा.

यानंतर, अजित पवार यांनी करमाळा दौरा केला, मात्र जगताप यांचा नामोल्लेख असताना देखील ते या दौऱ्यात अनुपस्थित राहिले. या घडामोडींमुळे जगताप यांच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. गेल्या वर्षी, करमाळा कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीत मोहिते पाटील यांच्यामुळे बिनविरोध निवड झाली होती, आणि त्यानंतर जगताप यांची मोहिते पाटील व माजी आमदार नारायण पाटील यांच्याशी जवळीक वाढली आहे. लोकसभा निवडणुकीत जगताप गटाने मोहिते पाटील यांना पाठिंबा दिला होता. जगताप यांच्या आगामी भूमिकेवर विधानसभा निवडणुकीचे भविष्य अवलंबून आहे, कारण जगताप कुटुंबाने आतापर्यंत १६ निवडणुका लढविल्या असून, यामध्ये ११ वेळा विजयी झाले आहेत. या सर्व मुद्द्यांवर जगताप यांना विचारले असता, त्यांनी सांगितले की, तालुक्याच्या विकासासाठी आणि कार्यकर्त्यांच्या हितासाठी योग्य वेळी योग्य निर्णय जाहीर करतील.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळे वस्ती येथे मतदार जनजागृती फेरी संपन्न

**सोलापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नाळे वस्ती येथे करमाळा माढा मतदारसंघ निवडणूक निर्णय अधिकारी अंजली मरोड, तहसीलदार शिल्पा ठोकडे, आणि गटशिक्षणाधिकारी जयवंत नलावडे यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जागृतीसाठी प्रभात फेरी काढण्यात आली.

मुख्याध्यापक संतोष पोतदार यांच्या नेतृत्वात आयोजित या फेरीत पालक, विद्यार्थी, आणि शिक्षक अनुराधा शिंदे यांचे समवेत विविध घोषणांची देवाणघेवाण करण्यात आली. फेरी दरम्यान, उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांनी मतदान जागृती संदर्भात घोषणांची घोषणा केली. यामध्ये शिवाजी नाळे, हनुमंत येळे, अक्षय नाळे, अच्युत नाळे, योगेश नाळे, स्वप्नाली नाळे, ज्ञानेश्वरी नाळे, राधिका




नाळे, आर्या नाळे, मोनिका नाळे, सृष्टी बंडगर, नवनाथ येळे, आणि अमर बागडी हे सर्व उपस्थित होते. या फेरीने मतदार जागृतीसाठी महत्वपूर्ण कार्य केले असून, सर्व नागरिकांनी मतदानाच्या प्रक्रियेत सक्रिय भाग घेण्याचे आवाहन करण्यात आले.

# दिशा स्कूल ऑफ इनोव्हेटिव लर्निंगच्या विद्यार्थ्यांची विभागीय स्पर्धेकडे आगेकूच

**वरोरा । प्रतिनिधी**

तालुका क्रीडा संकुल, ब्रम्हपुरी येथे नुकत्याच पार पडलेल्या शालेय जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत दिशा स्कूल ऑफ इनोव्हेटिव लर्निंगच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. या यशामुळे सलग दुसऱ्या वर्षी विभागीय स्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली आहे.

या स्पर्धेत १४, १७, व १९ वर्षे वयोगटातील आष्टा-डू मर्दानी आखाडा प्रकारात विद्यार्थ्यांनी प्रभावी खेळ सादर केला. १४ वर्षे वयोगटातून कु. भूमी टेमुर्डे, किरण गोचे, कृतिका बेहरे, आराध्या शंभरकर, अवनी उमरे, शौर्य कारेकार, तन्मय विरुटकर, अर्णव कोसमकर, आलोक चौधरी आणि श्लोक दोहारकर यांनी चमकदार कामगिरी केली.



तसेच, १७ वर्षे वयोगटात पद्मश्री झुरळे व सानिया आवारी यांनी उत्कृष्ट खेळ करत विजेतेपदावर मोहोर उमटवली.

विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय मुख्याध्यापिका नीता खेवले, क्रीडा शिक्षक रवी चरूरकर, समन्वयक शुभम पिसे, तसेच शिक्षक लंकेश भेले आणि घनश्याम खोंडे यांना दिले आहे. दिशा स्कूलचा हा यशस्वी प्रवास विद्यार्थ्यांच्या मेहनतीसोबतच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि खेळाला मिळालेल्या प्रोत्साहनामुळे साध्य झाल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

# विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलिसांना मोठे यश; पाच नक्षलवाद्यांचा खात्मा

**गडचिरोली । प्रतिनिधी**

महाराष्ट्र आणि छत्तीसगड सीमेवर झालेल्या चकमकीत गडचिरोली पोलिस दलाच्या सी-६० जवानांनी पाच नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गडचिरोली पोलिसांनी मिळवलेले हे यश अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. जिल्ह्यात विध्वंसक कारवाया घडवून निवडणूक प्रक्रियेत अडथळा निर्माण करण्यासाठी काही नक्षलवादी कट रचत असल्याची गोपनीय माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांना मिळाली. या माहितीच्या आधारे महाराष्ट्रातील गडचिरोली आणि छत्तीसगडमधील नारायणपूर सीमेलगत असलेल्या भामरागड तालुक्यातील कोपर्शी जंगल परिसरात माओवाद विरोधी अभियान राबविण्यासाठी सी-६० पथकाच्या २२ तुकड्या आणि सीआरपीएफच्या ट-ढ पथकाच्या दोन तुकड्या तैनात करण्यात आल्या.

कोपर्शी जंगलात दोन ठिकाणी हे अभियान सुरू करण्यात आले. पोलिस पथके त्या ठिकाणी पोहोचताच नक्षलवाद्यांनी अंदाधुंद गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी केलेल्या गोळीबारात पाच नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला. चकमकीनंतरही परिसरात शोधमोहीम सुरू असून, पाच नक्षलवाद्यांचे मृतदेह हस्तगत करण्यात आले आहेत. मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू असून, याबाबतची सविस्तर माहिती उद्या आयोजित पत्रकार परिषदेत दिली जाणार आहे. विशेष म्हणजे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी २०२६ पर्यंत दंडकारण्य प्रदेश पूर्णतः नक्षलमुक्त करण्याचे उद्दिष्ट जाहीर केले होते. यानंतर नक्षलग्रस्त भागातील मुख्यमंत्र्यांची बैठक घेतली गेली. छत्तीसगड राज्यातील पोलिसांनीही गडचिरोली पोलिसांप्रमाणेच आक्रमक मोहिमा हाती घेतल्या आहेत. नुकत्याच झालेल्या दोन चकमकींमध्ये छत्तीसगड पोलिसांनी तब्बल ३८ नक्षलवाद्यांचा खात्मा केला आहे. छत्तीसगडमधील वाढता पोलिसी दबाव लक्षात घेऊन नक्षलवादी महाराष्ट्र आणि तेलंगाणा सीमेकडे पलायन करत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे दोन्ही राज्यांच्या सीमेवर माओवाद विरोधी मोहिमा अधिक तीव्र करण्यात आल्या आहेत. याच पार्श्वभूमीवर छत्तीसगड सीमेलगतच्या भामरागड तालुक्यातील कोपर्शी जंगल परिसरात ही मोठी चकमक घडली, ज्यात पाच नक्षलवाद्यांचा खात्मा करण्यात आला आहे.

# ६० वर्षांत कुणा मंत्र्यांनी आणला नाही तेवढा निधी भरतशेठ गोगावलेंनी महाड मतदारसंघात आणला

## दासगाव पुलाला लोकनेते शांतारामभाऊ फिलसे यांचे नांव देणार : आ. गोगावले

**रायगड । प्रतिनिधी**

राज्यातील महायुती सरकारच्या अडीच वर्षांच्या कार्यकाळात गेल्या ६० वर्षांत कुणा मंत्र्यालाही आणता आला नाही एवढा मोठा निधी महाड मतदारसंघात आमदार भरतशेठ गोगावलेंनी आणल्याचा दावा त्यांनी केला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबतच्या विश्वासार्हतेमुळे हे शक्य झाले, असे सांगत गोगावलेंनी शिंदे यांचे कौतुक केले.

मुख्यमंत्री शिंदे फाईलींवर विश्वासाने सही करणारे नेते आहेत. ते घरात बसून काम करणारे नाहीत, तर रस्त्यावर उतरून जनतेत असतात. तुम्हाला असा मुख्यमंत्री हवा की घरात बसणारा? असा सवाल गोगावलेंनी मुंबईवासीयांच्या महाड तालुक्यातील नालासोपारा येथील मेळाव्यात उपस्थितांना विचारला. महाड तालुक्यातील मुंबईवासीयांचा भव्य मेळावा नालासोपारा येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला संपर्कप्रमुख अरुण चाळके, जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, माजी राजिप सदस्य जितेंद्र सावंत आणि खाडीपट्टा संपर्कप्रमुख एकनाथ सुकूम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

गोगावले यांनी मंत्रीपद मिळण्याची संधी असतानाही त्याग केला, हे त्यांनी त्यांच्या भाषणात सांगितले. महायुती सरकारच्या पहिल्या मंत्रिमंडळ विस्तारात माझे मंत्रीपद फायनल झाले होते. पण पक्षातील १० दावेदार आणि फक्त ९ मंत्रीपदे यामुळे मुख्यमंत्री धर्मसंकटात आले. त्यावेळी मी तानाजी मालुसरे यांच्या त्यागाचा आदर्श घेत मंत्रीपदाचा त्याग केला. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे माझ्या शब्दाला आजही मान देतात, असे गोगावले म्हणाले.

गोगावलेंनी मतदारसंघातील लोकांच्या सुखदुःखात कायम धावून जाण्याचा आपला पायंडा कायम ठेवल्याचे सांगितले. मी कुठेही असलो तरी माझ्या




मतदारसंघातील एखाद्या नागरिकावर प्रसंग ओढवला की तातडीने त्याच्या मदतीसाठी धावतो. संपत्तीने मी मोठा नसतो, पण माझ्या घराबाहेर दररोज असलेल्या जनतेच्या गर्दीतच माझी खरी संपत्ती आहे, असे ते म्हणाले.

गोगावलेंनी पुढे सांगितले की, तुमचा आमदार मनाने मोठा आहे, जो सकाळी ७ वाजल्यापासून रात्री २ वाजेपर्यंत जनता दरबार घेतो. जनतेच्या सुखदुःखात सहभागी होणारा आमदार हवा की घरात बसून सत्ता भोगणारा नेता हवा, याचा विचार जनतेने करावा.

महाड मतदारसंघातील विकासकामांची यादी लवकरच १५० पानी पुस्तिकेद्वारे जनतेला देण्यात येणार असल्याचे गोगावले यांनी जाहीर केले. विरोधकांनी यात कोणतेही काम झाले नाही, असे सिद्ध करून दाखवावे, असे त्यांनी आव्हान दिले.

दासगाव येथील गोठे पुलाला लोकनेते स्वर्गीय शांतारामभाऊ फिलसे यांचे नांव देण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

गोगावले भाषण देत असताना वातावरणात अचानक पावसाची चिन्हे दिसू लागली. त्यावेळी त्यांनी उपस्थितांना जागेवरून उठू नये, असे आवाहन केले. भाषण संपेपर्यंत पाऊस थांबल्याने, वरुणराजानेही आपल्याला साथ दिली, असे गोगावले यांनी सांगितले.

या मेळाव्यात शिवसेनेच्या संपर्कप्रमुख, जिल्हाप्रमुख, महिला आघाडी, तालुकाप्रमुख आणि युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांसह विविध पक्षांतील असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. हजारोंच्या संख्येने झालेल्या या मेळाव्यामुळे महाड मतदारसंघातील राजकीय वातावरण तापले आहे.

# बेलमंडळ येथे वाळू तस्करीला ऊत ग्रामस्थांनी केली कारवाईची मागणी

**नांदेड । बालाजी पाटील**

हदगाव तालुक्यातील बेलमंडळ गावात वाळू तस्करीचा प्रश्न गंभीर बनला असून, या तस्करीमुळे रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. तस्करांवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांतून होत आहे. तातडीने उपाययोजना न केल्यास गावपातळीवर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

बेलमंडळ येथील रेती डेपोवरून चोवीस तास टिप्पर वाहतूक सुरू आहे. मद्यधुंद अवस्थेतील ड्रायव्हर वाहन चालवत असल्याने अपघातांचा धोका वाढला आहे. रस्त्यांवर झालेल्या दुरवस्थेमुळे नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

राज्यात वाळू उपसावर बंदी असली तरी हदगाव परिसरात चोरीछुपे वाळू उपसा मोठ्या प्रमाणात सुरू आहे. या तस्करीतून कोट्यवधी



रुपयांची उलाढाल होत असल्याचा अंदाज आहे. बांधकाम व्यावसायिकांकडून नैसर्गिक वाळूला प्राधान्य दिले जात असल्यामुळे तस्करांचा सुळसुळाट झाला आहे.

वाळू तस्करीवर नियंत्रण ठेवण्यात महसूल विभाग अपयशी ठरत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. तस्करांविरोधात तातडीने कारवाई करण्यात आली नाही, तर ग्रामपंचायत कार्यालयासमोर उपोषणास बसण्याचा इशारा देण्यात आला आहे.

तस्करीमुळे निर्माण झालेल्या समस्या सोडवण्यासाठी महसूल प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी जनतेतून होत आहे. अन्यथा पुढील काळात आंदोलने तीव्र करण्यात येतील, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

### हदगाव-हिमायतनगर विधानसभा निवडणूक

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून प्रल्हाद पाटील हाडसनीकर यांची उमेदवारी जाहीर

**नांदेड । बालाजी पाटील**

हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघात स्वाभिमानी शेतकरी संघटनेने उमेदवार जाहीर केला असून, हाडसनी गावचे भूमिपुत्र आणि हदगाव तालुका अध्यक्ष प्रल्हाद पाटील हाडसनीकर यांना निवडणूक रिंगणात उतरविण्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने लढणाऱ्या पाटील यांची उमेदवारी जाहीर झाल्यानंतर, काँग्रेस आणि शिंदे गटासाठी डोकेदुखी निर्माण झाल्याची चर्चा आहे.

प्रल्हाद पाटील हे शेतकऱ्यांच्या समस्यांसाठी नेहमीच संघर्षशील राहिले आहेत. त्यांनी अनेकवेळा धरणे आंदोलन, जलसमाधी आंदोलन, अर्धलग्न आंदोलन, रस्ता रोको यांसारख्या आंदोलनांच्या माध्यमातून




प्रशासनावर दबाव आणला आहे. पिकविमा, पीक कर्ज, आणि अनुदान यासंदर्भातही त्यांनी महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले आहेत, त्यामुळे त्यांची शेतकऱ्यांमध्ये मजबूत पकड आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश पोफळे आणि जिल्हाध्यक्ष राजे गोरे यांच्या नेतृत्वाखाली हदगाव येथील रेस्ट हाऊसमध्ये बैठक घेऊन प्रल्हाद पाटील यांच्या उमेदवारीची घोषणा करण्यात आली. या बैठकीला जिल्हा उपाध्यक्ष शिवाजीराव वानखेडे उपस्थित होते.

प्रल्हाद पाटील यांच्या उमेदवारीमुळे हदगाव-हिमायतनगर मतदारसंघात काँग्रेस आणि शिंदे गटासाठी आव्हान निर्माण झाले आहे. त्यांच्या उमेदवारीमुळे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता आहे.

ग्रामपातळीवरील लोकप्रियता आणि शेतकऱ्यांचा पाठिंबा लक्षात घेता, स्वाभिमानी शेतकरी संघटनेची लढत काट्याची होणार असल्याची चर्चा सर्वत्र सुरू आहे.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांकडून स्ट्राँग रूमची पाहणी



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

नेवासा येथील स्ट्राँग रूमची सुरक्षा आणि व्यवस्थापनाचा आढावा घेण्यासाठी रविवारी जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आणि जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी भेट दिली. निवडणूक प्रक्रियेसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या ईव्हीएम यंत्राच्या सुरक्षिततेच्या उपाययोजनांची तपासणी यावेळी करण्यात आली. मतमोजणीच्या दिवशी स्ट्राँग रूममधील जागेचे व्यवस्थापन कसे असेल, याची माहितीही जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली. पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी स्ट्राँग रूमचा परिसर आणि सुरक्षा व्यवस्था तपासून पाहिली. तसेच नेवासा तहसील कार्यालयातील निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय व इतर कक्षांनाही जिल्हाधिकाऱ्यांनी भेट देऊन पाहणी केली.

सुरक्षा आणि निवडणूक प्रक्रियेशी संबंधित कामे सुरळीत पार पाडण्यासाठी यावेळी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य सूचना दिल्या. आचारसंहितेची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या पाहणी दरम्यान नेवासा विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी अरुण उंडे, तहसीलदार डॉ. संजय बिरादार, नेवासा पोलीस निरीक्षक धनंजय जाधव, अपर तहसीलदार पाटील आणि नगरपंचायत मुख्याधिकारी सोनाली म्हात्रे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# निवडणूकीचे प्रशिक्षण २८ आक्टोबरपूर्वी किंवा १२ नोव्हेंबर नंतर घेण्याची महा. पुरोगामी शिक्षक संघटनेची मागणी

**मुल । प्रतिनिधी**

केंद्र व राज्य निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीच्या कार्यक्रमांची घोषणा केली आहे. महाराष्ट्रातील विधानसभेची निवडणूक २० नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार आहे. मतदान प्रक्रियेचे स्वरूप व पद्धत समजावून सांगण्यासाठी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे दोन टप्यात प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे.

मात्र, जिल्हा परिषद चंद्रपूर अंतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षकांना २८ ऑक्टोबर ते ११ नोव्हेंबर २०२४** पर्यंत दिवाळीच्या सुट्टी आहेत. दिवाळी हा हिंदु धर्मातील अत्यंत महत्वाचा सण आहे. या सणाच्या निमित्ताने प्राथमिक शिक्षक अनेकजण बाहेरगावी जातात. त्यामुळे, अशा महत्वाच्या सणासुदीच्या काळात प्रशिक्षण ठेवणे म्हणजे संबंधित शिक्षकांना त्यांच्या सणापासून वंचित ठेवण्याचा अन्यायकारक व अशोभनीय प्रकार ठरू शकतो.

यामुळे, निवडणूक संबंधीचे पहिले प्रशिक्षण २८ ऑक्टोबर पूर्वी आणि दुसरे प्रशिक्षण १२ नोव्हेंबर नंतर घेण्यात यावे, अशी संघटनात्मक विनंती महा. पुरोगामी शिक्षक संघटनेच्या राज्य नेत्यांनी केली आहे. या मागणीसाठी विजय भोगेकर, हरीश ससनकर, अल्का ठाकरे, दीपक वरहेकर, नारायण काबळे, किशोर आनंदवार, सुरेश गिलोरकर, गगाधर बोढे, सुनिल कोहपरे, दिवाकर वाघे, जीवन भोयर, सुभाष अडवे, सुनिता इटनकर, शालिनी खटी, पौर्णिमा मेहरकुरे, लता मडावी, सुलक्षणा गायकवाड यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी निवेदनाद्वारे ही मागणी केली आहे. जिल्हा प्रसिद्धीप्रमुख लक्ष्मण खोब्रागडे यांनी या संदर्भातील माहिती दिली.

# माळी महासंघाच्या ग्रामीण जिल्हाध्यक्ष पदी राकेश ठाकरे यांची निवड



**मुल । प्रतिनिधी**

माळी महासंघाच्या संघटनात्मक कार्याला गती देण्यासाठी आणि महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार ग्रामीण भागात अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने राकेश ठाकरे यांची चंद्रपूर जिल्हा ग्रामीण अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. माळी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष अरुण तिखे यांनी त्यांना नियुक्तीपत्र देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ठाकरे हे मुळात होतकरू व धडाडीचे युवा कार्यकर्ते असून, त्यांनी अनेक वर्षे युवा आघाडीचे पदभार सांभाळले आहेत. त्यांच्या या निवडीचे सर्वत्र कौतुक होत आहे. नियुक्तीच्या प्रसंगी झालेल्या बैठकीत माजी जिल्हा परिषद अध्यक्ष आणि महिला आघाडी प्रमुख संध्याताई गुरनुले , प्रदेश उपाध्यक्ष निलेश खरबडे, नगरसेवक रवी गुरनुले, माजी नगरसेविका वंदना तिखे, तसेच ऋषी कोटरंगे, सनिर केने, सूरज मांदाडे, बालगोविंद आदे, रुपेश नीकोडे, ओंमदेव मोहरले, विवेक मांदाडे उपस्थित होते.

या महत्त्वपूर्ण निवडीबद्दल माळी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. एस.एन. कोकोडे, सरचिटणीस चंद्रकांत बोरकर, मार्गदर्शक प्रा. रामभाऊ महाडोळे, विभागीय महासचिव गुरु गुरनुले, तसेच बंडूभाऊ गुरनुले, गुरुदास चौधरी, डॉ. पद्माकर लेंनगूरे, हसन वाढई, अनंत लेंनगूरेयांच्यासह महासंघाचे विविध पदाधिकारी आणि समाजबांधवांनी राकेश ठाकरे यांचे अभिनंदन केले आहे. राकेश ठाकरे यांच्या निवडीमुळे माळी महासंघाच्या कार्याला जिल्ह्यात नवचैतन्य मिळेल आणि संघटना अधिक बळकट होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# शिवाजी कर्डिलेंना उमेदवारी जाहीर होताच शेकडो कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील कुलदीप पवार आणि नरेंद्र शेटे यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह माजी मंत्री शिवाजी कर्डिले यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कर्डिले यांना उमेदवारी जाहीर होताच मतदारसंघातील अनेक कार्यकर्ते भाजपमध्ये सामील होत आहेत.

माजी मंत्री कर्डिले हे हक्काचा माणूस म्हणून ओळखले जात असल्यामुळे त्यांचा विजय निश्चित असल्याचा विश्वास कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत आहे. या प्रवेश सोहळ्यात सुरेश बानकर, नंदू डोळस, भैय्या शेळके, ज्ञानेश्वर भिंगारदे, रवी म्हसे, सचिन शेटे, उमेश शेळके, अभिजित लिप्टे, भिमराज आव्हाड, रंभाजी गावंडे, बाबासाहेब शिंदे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांचा समावेश होता.

राहुरी, पाथर्डी आणि नगर मतदारसंघातील युवकांनी मोठ्या प्रमाणावर भाजपमध्ये प्रवेश केला असून, यामुळे मतदारसंघात राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्राजक्त तनपुरे



यांच्या बालेकिल्ल्यातूनच कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या तोंडावर कर्डिलेंना पाठिंबा दिल्यामुळे विरोधकांमध्ये खळबळ उडाली आहे.

या प्रवेश सोहळयादरम्यान मच्छिंद्र हरीश्चंद्रे, भाऊसाहेब जाधव, गौतम माळी, अमोल उल्हापुरे, भैय्या बोरूनडे, लक्ष्मण खाचकर, रवी बलमे, कृष्णा मोटे, लाला शेडगे, पवा गिरासे, श्रीनाथ शेटे, मनोज बाचकर, अविनाथ तोडमल, गणेश रंगले, हेमंत मकासरे, रवेन बाचकर, अविनाश चोपडे, जयपाल गिरासे, युवराज बर्डे, जुनेदभाई इनामदार आणि दीपक पेंढारे यांचा समावेश होता. कर्डिलेंच्या उपस्थितीत मोठ्या संख्येने झालेल्या या प्रवेशामुळे विधानसभा निवडणुकीत भाजपचे संख्याबळ वाढले असून, कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आहे.

# प्रकाश राजाभाऊ देव केदारे यांना 'संघर्ष योद्धा' पुरस्काराने सन्मानित

**जालना । लक्ष्मण उजगरे**

प्रकाश राजाभाऊ देव केदारे यांना २० ऑक्टोबर रोजी जालना येथील स्वयंवर मंगल कार्यालयात स्व. विलास नाईक प्रतिष्ठानच्या वतीने संघर्ष योद्धा पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या पत्नी अलका केदारे यांच्यासह हा पुरस्कार स्वीकारताना त्यांनी समाजसेवेतील उल्लेखनीय कार्याचा गौरव केला.

प्रकाश केदारे यांनी ब्राह्मण समाजाच्या हितासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना व्हावी, यासाठी पाच दिवस अन्नत्याग उपोषण केले होते. उपजिल्हाधिकाऱ्यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर बाजीराव भैया धर्माधिकारी आणि अल्पसंख्याक विभाग प्रदेशाध्यक्ष (शिवसेना - शिंदे गट) सईद खान यांच्या उपस्थितीत त्यांनी उपोषणाची सांगता केली.

केदारे यांचे कार्य बहुमुखी आणि प्रेरणादायी आहे. त्यांनी आतापर्यंत तीन मंदिरे बांधली असून, या मंदिरांद्वारे दरवर्षी श्रीमद्भागवत कथा आणि महापंगतीचे आयोजन केले जाते. त्यांनी अनेक गरीब आणि गरजू मुलामुलींचे विवाह स्वतःच्या सहकाऱ्यांच्या मदतीने लावून दिले आहेत.

केदारे यांनी आजवर १६२ अनाथ मुलींचे संगोपन करत, त्यांना स्वतःचे नाव दिले आहे. सध्या ते चार अनाथ लोकांचा देखील स्वखर्चातून सांभाळ करत आहेत. समाजातील अनेक गरजूंना आर्थिक, वैद्यकीय आणि इतर प्रकारे सतत मदत करत राहणे हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे.

आध्यात्मिक आणि सामाजिक कार्यातही केदारे आघाडीवर असून, श्रीमद्भागवत कथाघडवून धर्म, देश आणि समाजाबाबत जनजागृती करण्याचे काम ते करतात. त्यांच्याकडे रोज अनेक लोक समाधान शोधत येतात, आणि प्रत्येकाला ते आपल्या परीने योग्य मार्गदर्शन देतात. त्यामुळे केदारे यांना पाथरीसह इतर समाजातही मोठी लोकप्रियता लाभली आहे.

पुरस्कार स्वीकारताना केदारे यांनी भारती नाईक आणि श्रेया नाईकयांचे विशेष आभार मानले. त्यांनी या कार्यामध्ये सहकार्य करणाऱ्या नितीन पाटील, वैभव मुळे, अशोक जोशी, मनोज केदारे, गोविंद सारंग आणि माऊली सारंग यांचेही आभार व्यक्त केले. प्रकाश केदारे यांना आतापर्यंत विविध शहरांमधून शेकडो पुरस्कार प्राप्त झाले आहेत. समाजातील सर्वच स्तरातून त्यांच्या कार्याचे कौतुक होत असून, संघर्ष योद्धा पुरस्कार हा त्यांच्या अथक सेवाकार्यातील आणखी एक मानाचा तुरा ठरला आहे.

# उमेदवारी अर्ज भरण्यास आजपासून सुरुवात

## निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून जय्यत तयारी

**अहेरी | प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने १५ ऑक्टोबर रोजी विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केल्यानंतर जिल्ह्यात आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकीतील पहिला आणि महत्त्वाचा टप्पा म्हणजे नामनिर्देशन पत्र दाखल करणे. आज, मंगळवार २२ ऑक्टोबरपासून सर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये नामनिर्देशन प्रक्रिया सुरू होत आहे. ६९-अहेरी विधानसभा क्षेत्राचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कुशल जैन यांनी यासाठी जय्यत तयारी केली आहे.



उपविभागीय अधिकारी कार्यालय, अहेरी येथे नामनिर्देशनासाठी विशेष शाखा तयार करण्यात आली असून, जवळपास १५ अधिकारी आणि कर्मचारी कामकाज सांभाळणार आहेत. निवडणूक निर्णय अधिकारी कुशल जैन यांच्या मार्गदर्शनाखाली अहेरीचे तहसीलदार व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी बालाजी सोमवंशी, सिरोंचाचे नायब तहसीलदार एच. एस. सय्यद, अहेरीचे नायब तहसीलदार एन. सी. दाते, पंचायत समिती अहेरीचे विस्तार अधिकारी वैभव कवीश्वर आणि अन्य अधिकारी यांच्यासह संदीप गंग्रस, शेखर मेश्राम, एम. ए. गगुरी, पराग खोब्रागडे, गणेश कुंभारे, अमोल गेडाम, निशा गर्गम, वैभव पाटील, मनोज रामटेके, चंदूलाल रामटेके, अनिल चव्हाण, गोविंदा दुर्गे, मोनेश पाटील आणि अमजद खान पठाण आदी कर्मचारी या प्रक्रियेत सहभागी राहणार आहेत.

उमेदवार सकाळी ११ ते दुपारी ३ या वेळेत अर्ज दाखल करू शकतील. नामनिर्देशन प्रक्रिया २९ ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार असून सार्वजनिक सुट्ट्या वगळून अर्ज स्वीकारले जातील. कार्यालयातील नामांकन, छाननी, चिन्ह वाटप आणि दैनंदिन अहवालासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. सर्व प्रक्रिया व्हिडिओ शूटिंगद्वारे नोंदवली जाणार आहे. उमेदवार आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी बसण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. सोमवारी, २१ ऑक्टोबर रोजी तहसीलदार व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी बालाजी सोमवंशी यांनी शाखेतील कर्मचाऱ्यांचे कामकाजाचे प्रात्यक्षिक घेतले. निवडणूक निर्णय अधिकारी कुशल जैन आणि उपविभागीय अधिकारी नमन गोयल यांनी विविध शाखांची पाहणी करून कामकाजाचा आढावा घेतला. त्यांनी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सज्ज राहण्याचे निर्देश दिले. पाहणीच्या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अजय कोकाटे आणि पोलीस निरीक्षक स्वप्नील इज्जतवार उपस्थित होते.नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी आजपासून सुरू होणाऱ्या प्रक्रियेमुळे उमेदवारांसह कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. २१ ऑक्टोबर रोजी निवडणूक निर्णय अधिकारी कुशल जैन यांनी पोलीस अधिकाऱ्यांची सभा घेऊन मार्गदर्शन केले.

# शहीदवीर बाबुराव शेडमाके यांना हंसराज अहीर यांची आदरांजली



**चंद्रपूर | प्रतिनिधी**

ब्रिटीश राजसत्तेला आव्हान देत सळो की पो करून सोडणारा आदिवासी योध्दा शहीदवीर बाबुराव पुलेसूर शेडमाके यांच्या शहीद दिनानिमित्त राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी जिल्हा कारागृह परिसरातील शहीद स्थळावर जावून या शहीदवीरांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून आदरांजली वाहिली.दि. २१ ऑक्टोंबर २०२४ रोजी शहीद दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास समाजाचे युवा नेते गणेश गेडाम, कमलेश आत्राम, माजी नगरसेवक प्रदीप किरमे, माजी नगरसेविका ज्योती गेडाम, प्रिया आत्राम, गौतम यादव, राजु येले, संजय खनके, राजवीर चौधरी, राहुल सुर्यवंशी, चेतन शर्मा, सुदामा यादव, अनिल सुरपाम, दिवाकर मेश्राम, विलास मसराम, रवी मेश्राम, विठ्ठल कुमरे, आकाश चंदनखेडे, ओमकार गेडाम, रामप्रवेश यादव, साईराम मडावी, अनिल सिडाम, अंजली सुरपाम, राकेश गेडाम, प्रफुल मडावी, मनोज गेडाम यांचेसह समाजाचे पदाधिकारी तसेच भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत वीट विद्यालयाचा ऐतिहासिक विजय

**सोलापूर | प्रतिनिधी**

शुक्रवारी, १८ ऑक्टोबर २०२४ रोजी जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर आयोजित जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धेत श्री छत्रपती शिवाजी विद्यालय, वीटच्या १४ वर्षे वयोगटातील मुला-मुलींनी नवा इतिहास रचला. मुलांच्या संघाने अंतिम सामन्यात वेळापूरच्या लोकविकास प्रशालेवर ८ गुणांनी विजय मिळविला, तर मुलींच्या संघाने वाडी कुरोली, ता. पंढरपूरच्या वसंतराव काळे प्रशाला संघावर २ गुणांनी विजय मिळवला.



एकाच प्रशालेतील दोन्ही संघांनी जिल्हास्तरावर विजय मिळवून एकत्रितपणे विक्रम रचला आहे. ३२ वर्षांनंतर वीट विद्यालयाला हे यश मिळाल्यामुळे ग्रामस्थांनी खेळाडूंची गावातून जंगी मिरवणूक काढली. मिरवणूकीनंतर खेळाडूंचा व पर्यवेक्षक, तसेच क्रीडाशिक्षक श्री दादासाहेब बरडे सर, श्री विनोद ढेरे सर आणि श्री जगन्नाथ जाधव सर यांचा जाहीर नागरी सत्कार करण्यात आला. शाळेच्या यशाबद्दल संस्थेचे सचिव श्री देविदास ढेरे सर, संचालक डॉ. राजेश बरडे साहेब, प्रशालेचे मुख्याध्यापक संजय कोळेकर सर, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी मनापासून अभिनंदन केले आणि विभाग स्तरासाठी शुभेच्छा दिल्या. वीट विद्यालयाच्या या यशामुळे स्थानिक खेळाच्या क्षेत्रात एक नवीन ऊर्जा संचारली आहे, आणि खेळाडूंनी पुढील स्पर्धांमध्येही यश मिळवण्याची आशा व्यक्त केली आहे.

# साकूर येथे डॉ.सुजय विखे पाटीलांचा घणाघात

## निष्क्रीय आमदारांवर केले जोरदार टीकास्त्र सोडले

**संगमनेर | प्रतिनिधी**

तालुक्यातील साकूर येथे आयोजित युवा संकल्प मेळाव्यात बोलताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी आमदारांवर जोरदार टीका केली. संगमनेरमधील आमदारांच्या चाळीस वर्षांच्या कारभारावर बोललो तर राग येण्याचं कारण काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. लोकशाही प्रक्रियेत जनतेला मायबाप मानलं जातं, त्यामुळे तालुक्यातील आमदारांच्या निष्क्रियतेवर आवाज उठवला जातो, असं स्पष्ट केलं. डॉ. विखे पाटील म्हणाले, पठार भागातील जनतेला पाणी मिळवण्यासाठी चाळीस वर्षे सत्ता असूनही काहीही प्रयत्न झाले नाहीत. युवकांना रोजगाराच्या संधी दिल्या गेल्या नाहीत. आमच्या वडिलांवर तुमच्या मनासारखी टीका करणे योग्य नाही. पण आम्ही संयम दाखवून राजकारण करतो. त्यांनी प्रस्थापितांच्या विरोधात आवाज उठवण्याची गरज अधोरेखित केली.



तुम्ही निवडून दिलेल्या लोकांचा बाप काढणं योग्य आहे का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. यावर डॉ. विखे पाटीलांनी नमूद केले की, येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत जनता ठरवेल की तालुक्याचा बाप कोण आहे. त्यांनी साक्षात्कार दिला की, ताईच्या गाडीत बसलेले लोकच त्यांचा घात करणार आहेत.युवकांना प्रस्थापितांना धडा शिकवण्याचं आवाहन करताना डॉ. विखे म्हणाले, आमचा आवाज तुम्ही दाबू शकत नाही. जेवढा आवाज दाबाल, तो तुमच्या घरापर्यंत येईल.

राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार येण्याची अपेक्षा व्यक्त करताना, आमदार महायुतीचा असावा, असं त्यांनी सांगितलं. यावेळी बाबासाहेब कुटे, गुलाबराजे शेळके यांच्यासह अनेक सरपंचांनी भाजपमध्ये प्रवेश करून महायुतीला पाठिंबा दिला. युवा संकल्प मेळाव्यात झालेल्या या चर्चेत आमदारांच्या निष्क्रियतेवर जोरदार टीका करण्यात आली, जी आगामी निवडणुकांमध्ये मोठा प्रभाव पडेल, असे चित्र आहे.

# उपजिल्हा रुग्णालयातील निष्काळजीपणामुळे चिमुकल्या बाळावर नांदेड येथे उपचार

**नांदेड | बालाजी पाटील**

उंचाडा (ता. हदगाव) येथील संदीप कदम यांच्या नवजात बाळावर लसीकरणानंतर गाठ निर्माण झाल्याने उपचारासाठी नांदेड येथील खासगी रुग्णालयात दाखल करावे लागे आहे. कदम यांनी उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर निष्काळजीपणाचा आरोप केला आहे.

कदम यांच्या पत्नीची ६ ऑक्टोबर २०२४ रोजी हदगाव उपजिल्हा रुग्णालयात नॉर्मल डिलिव्हरी झाली होती. प्रसूतीनंतर तीन दिवसांनी सुट्टी देताना रुग्णालयाने बाळाला लस दिली. या लसीमुळे बाळाच्या शरीरावर गाठ निर्माण झाली. बाळाला त्रास होत असल्याचे दिसून आल्यानंतर कदम यांनी त्याला उपजिल्हा रुग्णालयात पुन्हा दाखल केले. मात्र, रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी उडवाउडवीची उत्तरे देत खासगी रुग्णालयात नेण्याचा सल्ला दिला, असा आरोप कदम यांनी केला आहे.

-गंभीर त्रास होऊ लागल्यामुळे कदम कुटुंबीयांनी बाळाला नांदेडच्या खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. १० दिवसांपासून बाळावर उपचार सुरू असून, त्याची प्रकृती सुधारण्याच्या प्रतीक्षेत कुटुंबीय आहेत. संदीप कदम यांनी आरोग्यसेवांमधील दुर्लक्ष आणि बेजबाबदारपणाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकारी रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांना योग्य उपचार मिळावेत अशी अपेक्षा आहे, मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे आम्हाला बाळाला खासगी रुग्णालयात नेण्यास भाग पाडले, असे कदम यांनी सांगितले.

हदगाव उपजिल्हा रुग्णालयाला कोट्यवधी रुपये खर्च करून सुसज्ज करण्यात आले आहे. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बेजबाबदार वागणुकीमुळे गरीब रुग्णांना जीव मुठीत धरून उपचार घ्यावे लागत आहेत. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी कदम यांनी केली आहे. सरकारी रुग्णालयांतील वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे रुग्णांची गैरसोय आणि त्रास होत असल्याचे हे प्रकरण अधोरेखित करते. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन सुधारणा केल्या नाहीत, तर आरोग्य व्यवस्थेबद्दल नागरिकांचा विश्वास कमी होण्याची शक्यता आहे.

# प्रचारासाठी नव्हे,समस्या जाणून घेण्यासाठी आलो-आ.यशवंत माने

## मोहोळ मतदारसंघातील गावभेट दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मोहोळ | प्रतिनिधी**

आमदार यशवंत माने यांनी मोहोळ मतदारसंघातील गावभेटी दौऱ्यात मतदारांशी संवाद साधताना त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. मी प्रचारासाठी नाही, तर मतदारांशी थेट संवाद साधण्यासाठी आणि त्यांच्या शिल्लक समस्यांची माहिती घेण्यासाठी आलो आहे. आचारसंहितेमुळे कुठलाही शब्द देऊ शकत नाही, पण राहिलेली विकासकामे प्राधान्याने पूर्ण करण्याचा प्रयत्न नक्की करेन, असे आ. माने यांनी यावेळी स्पष्ट केले.

उत्तर सोलापूर भागातील भोगाव, बानेगाव, होनसळ, मार्डी, नरोटेवाडी, कारंबा, गुळवंची, अकोले काटी आणि बिबिदारफळ या गावांमध्ये झालेल्या दौऱ्यास नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. दौऱ्यात माने यांनी विविध ठिकाणी विकासकामांची पाहणी केली आणि स्थानिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी समजावून घेतल्या. गेल्या दहा वर्षांत न झालेली अनेक विकासकामे आमदार माने यांच्या प्रयत्नांतून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून पूर्ण झाली आहेत, असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्य रोजगार हमी मंडळाचे अध्यक्ष शहाजी पवार यांनी यावेळी काढले. आगामी विधानसभा निवडणुकीत माने यांना प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन पवार यांनी केले. या दौऱ्यात भारतीय जनता पार्टीचे कोषाध्यक्ष इंद्रजित पवार, जिल्हा उपाध्यक्ष काशिनाथ कदम, प्रविण भालशंकर, अविनाश मार्तंड, प्रकाश चोरेकर, सुनील भोसले, दाजी गोफणे यांसह अनेक पदाधिकारी, सरपंच, उपसरपंच आणि मोठ्या संख्येने नागरिक, महिला उपस्थित होते.



**गावभेट दौऱ्यातून आ. माने यांनी विकासकामांबाबतचा आपला वचनबद्धतेचा पुनरुच्चार केला असून, या दौऱ्याने आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये सकारात्मक संदेश गेला आहे.**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# भावपूर्ण वातावरणात निराधारांच्या सेवेसाठी झटणाऱ्या अम्मांचा अंत्यसंस्कार,अनाथांची अम्मा पंचतत्त्वात विलीन

## आमदार किशोर जोरगेवार यांनी दिली अग्नी, सर्वधर्मीय प्रार्थना





**चंद्रपूर । प्रतिनिधी**

निराधार आणि गरीबांच्या सेवेसाठी झटणाऱ्या आणि समाजसेवेचे प्रतीक असलेल्या आमदार किशोर जोरगेवार यांच्या मातोश्री गंगुबाई उर्फ अम्मा यांच्या पार्थिवावर आज सकाळी भावपूर्ण वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. अम्मा यांनी काल सकाळी चंद्रपूरच्या राजमाता निवासस्थानी सर्वांचा निरोप घेतला. त्यानंतर आज त्यांच्या पार्थिवावर चंद्रपूर येथील बिनबा गेट शांतीधाम येथे शोकाकुल वातावरणात अंतिम संस्कार करण्यात आले.

त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक, विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजसेवक, आणि राजकीय नेते उपस्थित होते. अंत्यविधीमध्ये आमदार किशोर जोरगेवार आणि त्यांचे छोटे बंदू प्रशांत जोरगेवार यांनी आपल्या मातोश्रींना अग्नी दिला. तत्पूर्वी सर्वधर्मीय प्रार्थना करण्यात आली. अम्मांच्या निधनामुळे संपूर्ण जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. आज सकाळी १० वाजता कोतवाली वार्ड येथील मातोश्री निवासस्थानातून अम्मांच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली. त्यानंतर बिनबा गेट येथील मौक्षधाम येथे अम्मांच्या पार्थिवावर अंत्यविधी करण्यात आला. यावेळी अम्मा टिफिन परिवारासह हजारो नागरिकांनी नमत्या डोळ्यांनी अम्मांना अखेरचा निरोप दिला.

अम्मा यांचा अम्मा का टिफिन आणि अम्मा की दुकान या उपक्रमांनी चंद्रपूरात समाजसेवेचा नवा आदर्श निर्माण केला. गरजू, निराधार, आणि गरीब व्यक्तींना मदत करण्यासाठी त्या झटल्या. या उपक्रमातून अनेकांना रोजीरोटी मिळाली आणि समाजात एक नवा विश्वास निर्माण झाला. त्यांचे योगदान नेहमीच प्रेरणादायी ठरेल, असे यावेळी शोकसभेत नागरिकांनी म्हटले. अम्मांचे कष्टमय आणि सेवाभावी जीवन समाजातील प्रत्येक व्यक्तीला प्रेरणा देणारे राहील, असे नागरिकांनी भावुकतेने सांगितले.

सर्वधर्मीय धर्मगुरूंची प्रार्थना

अम्मांचे पार्थिव शरीर अंत्यदर्शनासाठी राजमाता निवासस्थानी ठेवण्यात आले होते. यावेळी सर्वधर्मीय धर्मगुरूंनी प्रार्थना करत अम्मांना आदरांजली अर्पण केली. यात हिंदू धर्मगुरू, ख्रिश्चन धर्मगुरू, बौद्ध धर्मगुरू, मुस्लिम धर्मगुरू आणि शीख धर्मगुरूंनी प्रार्थना केली.

# रायगड जिल्ह्यात शिवसेना (ठाकरे गट)चे तीन उमेदवार घोषित

**रायगड । मनोज उतेकर**

राज्यात महाविकास आघाडीतील जागावाटपावरून अजूनही पेच कायम असला तरी, शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे यांनी रायगड जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघांसाठी आपले उमेदवार निश्चित केले आहेत. संबंधित उमेदवारांना एबी फॉर्मही देण्यात आला आहे. महाडमधून स्नेहल जगताप , कर्जतमधून नितीन सावंत, आणि उरणमधून मनोहर भोईर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. ठाकरे गटाने या निवडींमुळे आगामी निवडणुकीत महाविकास आघाडीच्या आघाडीतील प्रभावी लढतीसाठी तयारी दर्शवली आहे.







### महाड मतदारसंघात स्नेहल जगताप विरुद्ध भरत गोगावले

**महाड विधानसभा मतदारसंघात स्नेहल जगताप यांना शिवसेनेची उमेदवारी देण्यात आली आहे. येथे त्यांचा सामना विद्यमान आमदार भरत गोगावले यांच्याशी होणार आहे. या मतदारसंघात महाविकास आघाडीतून इतर इच्छुक नसल्याने जगताप यांचे तिकीट पक्के करण्यात आले आहे.**

### उरणमधून मनोहर भोईर मैदानात

**उरण मतदारसंघात माजी आमदार मनोहर भोईर यांना अपेक्षेप्रमाणे शिवसेनेचे तिकीट मिळाले आहे. भोईर यांना यावेळी भाजप उमेदवार आणि विद्यमान आमदार महेश बालदी यांच्याशी लढत द्यावी लागणार आहे. बालदी यावेळी अधिकृतपणे भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवत आहेत. भोईर यांना पुन्हा तिकीट मिळाल्याने त्यांच्या समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.**

### महाविकास आघाडी विरुद्ध महायुती: रायगडमध्ये रंगतदार लढतीची अपेक्षा

**ठाकरे गटाच्या उमेदवारांची घोषणा होताच समर्थकांमध्ये जल्लोष करण्यात आला. राज्यभरात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी लढत रंगणार असून रायगडमधील तीन जागांवर ठाकरे गटाचे शिलेदार सज्ज झाले आहेत. महाड, कर्जत आणि उरण या मतदारसंघांतील या लढतींवर सर्वांचे लक्ष केंद्रित आहे. रायगडमधील या तीन उमेदवारांची घोषणा शिवसेना (ठाकरे गट) आणि महाविकास आघाडीच्या तयारीचे द्योतक आहे. सध्याच्या जागावाटपाच्या चर्चेतून स्पष्ट होते की रायगड जिल्ह्यात या निवडणुकीत चुरशीची लढत पाहायला मिळणार आहे.**

### कर्जत-खालापूरमध्ये तिरंगी लढत होण्याची शक्यता

**कर्जत-खालापूर मतदारसंघात नितीन सावंत यांना शिवसेनेने उमेदवारी जाहीर केली आहे. सावंत यांच्या एंट्रीमुळे येथे तिरंगी लढतीचे चित्र तयार झाले आहे. या मतदारसंघात विद्यमान आमदार महेंद्र थोरवे यांना महायुतीचे सुधाकर घारे आणि सावंत यांच्याशी एकाच वेळी झुंज द्यावी लागणार आहे.**

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघ गिर गाव शाखेचा विजयादशमी उत्सव व शस्त्रपूजन संपन्न

### मुसळधार पावसातही नियोजित कार्यक्रम पार पडला

**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभिड तालुक्यातील सांस्कृतिक विविधतेने नटलेले गिरगाव येथे वर्षभर विविध प्रकारचे कार्यक्रम, नाटक, लोकनाट्य, दंडार, आणि सण उत्सव साजरे केले जातात. या गावाला एक मोठी सांस्कृतिक परंपरा लाभलेली आहे, तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संस्कारांची जुनी परंपरा देखील आहे. येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शाखेचा विजयादशमी उत्सव मोठ्या उत्साहात सार्वजनिक स्वरुपात दरवर्षी साजरा केला जातो. यावर्षी, बस स्टॉप चौक गिरगाव येथे १९ ऑक्टोबर २०२४ रोजी, शनिवारच्या सायंकाळी सहा वाजता, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विद्यार्थी शाखा आणि व्यवसायी शाखेच्या संयुक्तपणे शस्त्र पूजन आणि विजयादशमी उत्सव साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून *सुधिरजी सुकारे*, जिल्हा बौद्धिक प्रमुख, यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम सुरू असतांना मुसळधार पाऊस सुरू झाला. अशा भर पावसातही हा कार्यक्रम नियोजितपणे पार पडला. संघ स्वयंसेवकांनी पाऊसाची तमा न बाळगता उत्सव साजरा केला. यावेळी संस्कार, अनुशासन, आणि नियोजीत वेळ पाळण्याचे संघाचे संस्कार उपस्थितांना दिसून आले.

कार्यक्रमात दंडक्रमिका, नियुध्द, योगासने, सांघिक व्यायाम योग इत्यादी अनेक शारीरिक क्रिडाप्रकार घेण्यात आले. विद्यार्थी शाखा कार्यवाह *रोहित रमेश बोरकर* यांनी अमृतवचन, *चेतन देविदास शेंडे* यांनी



सुभाषित, आणि व्यवसायी शाखेचे मुख्य शिक्षक *दिनेश लक्ष्मण कोठेवार* यांनी वैयक्तिक गित सादर केले. प्रास्ताविक व परिचय व्यवसायी शाखा कार्यवाह *निरंजन रामराव बोरकर* यांनी केला. शाखा संचालन विद्यार्थी शाखा मुख्य शिक्षक *धिरज गहाणे* यांनी केले. प्रसंगी जिल्हा संघचालक *यदुनाथजी बोरकर, माजी जिल्हा संघचालक **राधेश्यामजी जैस्वाल सर, तालुका शारीरिक प्रमुख **देवेंद्र गंगाधरजी बोरकर, उपखंड सहकार्यवाह **दिलिप वाढई, ज्येष्ठ स्वयंसेवक **दयानंद बोरकर सर, **मधुकरराव बोरकर, **मधुकरराव नेरकर सर*, विद्यार्थी शाखा आणि व्यवसायी शाखेचे संपूर्ण स्वयंसेवक, गावातील सज्जन नागरिक, बंधू, माता-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस हुतात्मा दिवस कार्यक्रमाचे आयोजन: भंडाऱ्यात शहीद पोलिसांना श्रद्धांजली

**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा येथे पोलीस हुतात्मा स्मृतीदिवस मोठ्या श्रद्धेने पाळला गेला. २१ ऑक्टोबर हा दिवस कर्तव्यावर अग्रेसर होत आपल्या मातृभूमीसाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या वीर पोलीस जवानांच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. यानिमित्ताने आज पोलीस मुख्यालय, भंडारा येथील पोलीस हुतात्मा स्मारक स्मृतिस्तंभावर स. ०८.०० वाजता श्रद्धांजली व शोक सलामीचे आयोजन करण्यात आले. यावेळी पोलीस अधिक्षक नूरुल हसन, अपर पोलीस अनिकेत भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी मनोज सिडाम, नितीन चिचोंळकर, प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) उपस्थित होते. *पोलीस अधिक्षक नूरुल हसन* यांनी आपल्या भाषणात आजचा दिवस पोलीस क्षेत्रासाठी अत्यंत महत्वाचा असल्याचे सांगितले. या वर्षी एकूण २६४ पोलीस अधिकाऱ्यांनी मातृभूमीच्या संरक्षणार्थ प्राणाची आहुती दिली आहे, असे ते म्हणाले. त्यांनी २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लद्दाखमध्ये केंद्रीय राखीव पोलीस दलावर झालेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्याबाबत सांगितले, ज्यात जवानांनी शौर्याने लढत हौतात्म्य पत्करले. यावेळी शहीद पोलिसांचे स्मारक उभारण्यात आले असून, स्मारकावर अंकित केलेले शब्द When you go home tell them of us. For their tomorrow we gave up our today सर्वांच्या मनाला भिडले.

कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर, पोलीस अधिक्षक



नूरुल हसन यांचे उपस्थितीत अपर पोलीस अनिकेत भारती, मनोज सिडाम आणि इतर पदाधिकाऱ्यांनी पुष्पचक्र अर्पण करून शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली. अग्नीशस्त्रांद्वारे ३० काडतूसांच्या फैरी झाडून शोक सलामी देण्यात आली.

पोलिस बँड पथकाने राष्ट्रभक्तीपर गीतांच्या धून वाजवून शहीदांना आदरांजली अर्पण केली. भंडारा जिल्हा पोलीस दलाने शहीद झालेल्या सर्व पोलिस अधिकाऱ्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

कार्यक्रमाच्या अंतर्गत शहीद पोलिस अधिकाऱ्यांची नावे वाचन करण्यात आली, ज्यामध्ये भंडारा जिल्ह्यातील शहीद पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची माहिती दिली गेली. शहीद पोलिसांच्या कुटुंबीयांचेही सदर कार्यक्रमात उपस्थित होते. संपूर्ण भंडारा जिल्ह्यातील पोलिसांनी शहीदांच्या स्मृतींना उजाळा देत, त्यांच्या साहसाचे आणि त्यागाचे कौतुक केले.

# उदगीर येथे पहिले राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संमेलन संपन्न

**उदगीर । प्रतिनिधी**

दि. २० ऑक्टोबर २०२४ रोजी उदगीरमध्ये पहिले राज्यस्तरीय पत्रकार साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष म्हणून राज्याचे माजी क्रीडा व बंदरे मंत्री *संजय बनसोडे* उपस्थित होते. या कार्यक्रमात उदगीर आणि जिल्ह्यातील अनेक पत्रकार बांधव तसेच शाळांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

या कार्यक्रमासोबतच *संविधान दिंडीचे आयोजनही करण्यात आले होते. ही दिंडी **डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा* येथून निघाली आणि *रघुनाथ मंगल कार्यालय* येथे तिची सांगता झाली. दिंडीत विविध क्षेत्रातील मान्यवर आणि पत्रकार बांधव विविध ठिकाणांहून उपस्थित



होते.

उदगीरच्या मातीत कला आणि साहित्याची जपणूक होत आहे, याकडे लक्ष वेधले गेले. संमेलनात उपस्थित व्यक्तींनी उदगीरच्या मातीत थोर पुरुषांचे आचार विचार जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. *साहित्य संस्कृती जपण्यासाठी सर्व उदगीरकरांनी एकजुटीने प्रयत्न करण्याची गरज आहे*, असे सर्वांनी एकमताने व्यक्त केले.

या संमेलनामुळे पत्रकारिता आणि साहित्याच्या क्षेत्रातील योगदानाला एक मान्यता मिळाली असून, या क्षेत्रात एकजुटीने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.

# मुजबी गावाजवळ अपघातग्रस्त तरुणाचे प्राण डॉ.अतुल टेंभुर्णे यांनी वाचविले

**भंडारा । प्रतिनिधी**

महामार्ग क्रमांक ५३ वर मुजबी गावाजवळ १७ ऑक्टोबर २०२४ रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास एका दुर्दैवी अपघाताची घटना घडली. एका अज्ञात वाहनाने मोटरसायकलला जोरदार धडक दिली, ज्यामुळे मोटरसायकलस्वार तरुण गंभीर जखमी होऊन रोडवर पडला. या अपघातात तो मोठ्या प्रमाणात रक्तस्त्रावामुळे अचेत अवस्थेत होता. महामार्गावरील लोकांनी मदतीसाठी पुढे येण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांच्या अज्ञानामुळे त्याच्या प्राणांवर संकट घोंगावत होते. याच वेळी, नागपूरवरून आपल्या घरी परतत असलेल्या जिल्हा सामान्य रुग्णालयाचे अतिरिक्त शल्यचिकित्सक *डॉ. अतुल टेंभुर्णे* यांची नजर अपघातस्थळी पडली. त्यांनी आपल्या वाहनाला थांबवून काही लोकांच्या मदतीने अपघातग्रस्त तरुणाला तपासले आणि त्याच्या श्वास चालू असल्याचे निदर्शनास आले.

वेळेचा मागमूस न पाहता, डॉ. टेंभुर्णे यांनी आपल्या वैयक्तिक वाहनात त्या तरुणाला तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. तिथे तत्काळ उपचार सुरू करून त्या तरुणाचे प्राण वाचविले. डॉ. अतुल टेंभुर्णे यांच्या या धाडसी आणि वेळीच केलेल्या मदतीमुळे आज सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे. हा प्रसंग दाखवतो की संकटसमयी वेळेवर केलेल्या धाडसपूर्ण मदतीमुळे कित्येकांचे प्राण वाचवता येऊ शकतात.



# प्रियकराच्या मदतीने वहिनीला पाठवते यमलोकात मंगला

## आईच्या जागेवर नोकरीसाठी प्लॅन तिचा भंगला

**जळगांव (प्रशांत कुंडकर) :– मंगलाची आजी अमळनेर नगरपालिकेत सफाई कर्मचारी म्हणून कामाला होती. कालांतराने मंगलाच्या आजीच्या जागेवर तिची आई पारोबाई ही सफाई कर्मचारी म्हणून कामाला लागली. अमळनेर शहरातील गांधलीपुरा परिसरात मंगला परशुराम घोगले ही अविवाहित तरुणी रहात होती. घरात तिच्यासह तिची आई, मोठा भाऊ जय, त्याची पत्नी शीतल आणि त्यांची मुले असा एकत्र परिवार रहात होता. मंगलाचा भाऊ जय हा एका सायकल रिपेअरिंगच्या दुकानावर कामाला जात होता. जय यास दारु पिण्याचे भारी व्यसन होते. दारूच्या व्यसनामुळे तो व्यवस्थित कामावर देखील जात नव्हता. दारुच्या व्यसनामुळे त्याची तब्येत नेहमी खराब राहत होती. त्यामुळे त्याच्यावर वैद्यकीय उपचार सुरु होते. तरी देखील त्याचे दारु पिण्याचे व्यसन काही केल्या सुटत नव्हते. त्याच्या दारु पिण्याच्या त्रासाला घरातील सर्वच जण वैतागले होते. जय कामाला जात नसल्यामुळे त्याची पत्नी शितल ही नाईलाजाने बाहेर मजुरीने कामाला जात होती. मुलगा जय याच्या दारुच्या व्यसनाला वैतागून त्याची आई पारोबाई हिने तिची सुन शितल हिला नगरपालिकेत आपल्या जागेवर सफाई कर्मचारी म्हणून कामाला लावण्याचा विचार केला होता. आपली आई पारोबाई हिने सेवानिवृत्ती घेऊन वहिनी शितल ऐवजी आपल्याला तिच्या जागी सफाई कर्मचारी म्हणून लावावे असे मंगलास वाटत होते.**


मंगलाचा प्रियकर करण (आरोपी)


मयत शितलची नणंद मंगला (आरोपी)


मयत शितल







पोलीस उपनिरीक्षक अक्षदा इंगळे










पारोबाई काम करत असलेल्या ठिकाणी करण मोहन घटायळे हा सफाईकर्मी कामाला होता. पारोबाई आणि करण हे दोघे सह कर्मचारी असल्यामुळे त्याचे पारोबाईच्या घरी नेहमी येणे जाणे होते. त्यातून नजरेच्या खेळात करण आणि मंगला यांचे प्रेमसंबंध जुळून आले. बघता बघता दोन वर्षाचा कालावधी उलटला. या दोन वर्षाच्या कालावधीत करण आणि मंगला यांचे प्रेमसंबंध अधिकाधिक घट्ट झाले. या दोन वर्षाच्या कालावधीत मंगला आणि करण यांचे प्रेमसंबंध घरात, गल्लीत आणि परिसरात सर्वांना कळून चुकले. मंगलामुळे आपल्या घराची समाजात आणि परिसरात बदनामी होत असल्याचे बघून तिची वहिनी शितल हिचा या प्रेमसंबंधाला विरोध होता.

आपल्या आणि करणच्या प्रेमासंबंधास वहिनी शितलचा विरोध बघून मंगलाचा तिच्यावर राग होता. याशिवाय आपली आई पारोबाई ही वहिनी शीतल हिलाच तिच्या जागेवर सफाई कर्मचारी म्हणून कामावर लावण्यास इच्छुक असल्याचे बघून मंगलाचा शितलवर अजूनच राग होता. एकंदरीत मंगलाच्या मनात शितल विषयी मोठा राग निर्माण झाला होता.

दरम्यान मंगला आणि करण यांचा प्रेमाचा सिलसिला लपून छपून सुरुच होता. करण याने मंगला हिस एक मोबाईल विकत घेऊन दिला. त्या मोबाईलचे सिम देखील त्याच्याच नावावर होते. त्या मोबाईलच्या माध्यमातून मंगला लपून-छपून करण सोबत बोलत होती. इतर वेळी मंगला तो मोबाईल स्विच ऑफ करून ठेवत होती. घरातील सर्वांची नजर चुकवून करण सोबत बोलण्यात आणि त्याची गुपचूप भेट घेण्यात अविवाहित मंगला जणू काही पारंगत झाली होती. दररोज सायंकाळी दूध विकत घेण्याच्या निमित्ताने ती घरातून बाहेर जात होती. घराबाहेर गेल्यावर ती करण सोबत आईस्क्रीमच्या एका दुकानावर त्याला चोरुन लपून भेटत होती. याशिवाय मद्यपी भाऊ जय याच्यासाठी दारुची बाटली विकत घेण्यासाठी देखील मंगला स्वतः वाईन शॉपवर जात होती. दूध आणि दारुची बाटली विकत घेण्याच्या निमित्ताने मंगला घराबाहेर पडली म्हणजे हमखास लपून छपून करणला भेटत होती. दारुची बाटली विकत घेण्यासाठी वाईन शॉप वर मंगलाचे जाणे करण यास आवडत नव्हते. त्यामुळे त्याने तिला वाईन शॉप वर जाण्यास मज्जाव केला. तो स्वतः दारुची बाटली विकत आणून मंगलाच्या हातात गुपचूप देऊ लागला. मंगला ती दारुची बाटली स्वतः आणल्याच्या अविर्भावात तिचा भाऊ जय याला रात्रीच्या वेळी पिण्यासाठी गुपचूप देत होती. अशाप्रकारे हा सर्व गुपचूप मामला सुरु होता.

मंगलाचा प्रियकर करण हा नदीवर जाऊन मासेमारी देखील करत होता. करण मासेमारी करण्यासाठी बोरी नदीवर आला म्हणजे मंगला देखील त्याला भेटण्यासाठी नदीवर जात होती. अशा प्रकारे मंगला आणि करण यांचा कधी नदीवर, कधी आईस्क्रीमच्या गाडीवर, कधी वाईन शॉपवर चोरुन लपून भेटण्याचा कार्यक्रम सुरुच होता. प्रेमसंबंध कितीही लपवले तरी ते कधी ना कधी उघड होतात. मंगला आणि करण यांचे चोरुन लपून भेटणे, मोबाईलवर चोरुन लपून बोलणे आदी चोरटे आणि चावट प्रकार तिची वहिनी शीतल हिला माहित पडले. त्यामुळे ती मंगलास या प्रकाराबाबत विरोध करत होती. हा प्रकार शितल तिची सासू अर्थात मंगलाची आई पारोबाई हिला सांगत होती. त्यामुळे पारोबाई तिची मुलगी मंगलास रागावत होती. त्यातून घरामध्ये वादाची ठिणगी पडू लागली. त्यामुळे मंगला तिची वहिनी शितलवर चिडून होती. आई पारोबाई ही नोकरीचा राजीनामा देऊन तिच्या जागेवर शितल हीस लावण्यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती मंगलास समजली. आईच्या जागेवर नोकरी करण्यास मंगला इच्छुक होती. त्यातून तिची करण सोबत दररोज खुलेआम भेट शक्य होणार होती. मात्र वहिनी शितलमुळे आपले नोकरीचे स्वप्न पूर्ण होईल अथवा नाही या बाबतीत मंगलास शंका होती. शितल आपल्या प्रेमात आणि नोकरीत अडसर ठरत असल्याचे मंगलास वाटत होते. त्यामुळे करणच्या मदतीने शितलचा काटा काढण्याचे मंगलाने मनाशी निश्चित केले.

२० सप्टेंबर २०२४ हा शितलच्या जीवनातील अखेरचा दिवस मंगला आणि करण या दोघांच्या माध्यमातून नियतीने निश्चित केला. या दिवशी मंगलाने करणच्या मदतीने वहिनी शितलची हत्या करण्याचे निश्चित केले. या दिवशी मंगलाने करण यास दोन ते तीन वेळा सकाळच्या वेळी व्हाट्सअँप कॉल केला. व्हाट्स अँप कॉलच्या माध्यमातून तिने करण यास सांगितले की मी माझी वहिनी शितल हिला सकाळी नऊ वाजेच्या सुमारास शौचास जाण्याच्या बहाण्याने बोरी नदीच्या काठालगत असलेल्या काटेरी झुडपात सोबत आणणार आहे. तू लवकर ये असे तिने त्याला फोनवर बजावले. ठरल्यानुसार सकाळी नऊ वाजता मंगला आणि शितल या दोघी नणंद – भावजय बोरी नदीच्या काठालगत काटेरी झुडपात शौचास सोबत गेल्या. त्या ठिकाणी करण घटायळे हा नदीपात्रातून दोघींजवळ मागच्या बाजूने गुपचूप आला. त्याने सोबत आणलेल्या लोखंडी सळईचा जोरदार हल्ला शितलच्या डोक्यावर मागील बाजूने केला. या अनपेक्षित जोरदार हल्ल्यात शितल जमिनीवर कोसळली.

शितल जमिनीवर कोसळताच मंगलाने तिचे डोके जमिनीच्या दिशेने दाबून ठेवले. त्यानंतर लागलीच करण याने तिचा गळा दाबला आणि लागलीच सळईचा देखील पुन्हा हल्ला केला. या हल्ल्यात तिच्या हातातील बांगड्या फूटल्या आणि काही वेळातच तिची हालचाल कायमची बंद झाली. शितलच्या चपला तिच्या पायात करण याने घालून तो नदीकिनारी निघून गेला. त्यानंतर मंगला तिच्या घरी निघून गेली.

मंगला एकटीच घरी आल्याचे बघून वहिनी शितल कुठे आहे? अशी तिला तिच्या आईने विचारणा केली. वहिनी सरपणासाठी जंगलातील लाकडे जमा करुन घरी येत आहे असे मंगलाने तिच्या आईला खोटेच सांगितले. त्यानंतर मंगलाने अंघोळ करून अंगातील कपडे धुऊन टाकले. त्यानंतर आई पारोबाईने सांगितल्याप्रमाणे मंगला मटन विकत घेण्यास दुकानावर गेली. बराच वेळ झाला तरी शितल घरी आली नाही त्यामुळे पारोबाई विचारात पडली. तिने गल्लीतील, परिसरातील समाजाच्या लोकांकडे जाऊन शितलची विचारणा करत शोध घेण्यास सुरुवात केली. मंगलाने देखील वहिनी शितलचा शोध घेण्याचा देखावा सुरु केला. समाजाचे लोक शीतलचा शोध घेत असताना त्यांना बोरी नदीच्या पात्रालगत असलेल्या काटेरी झुडपात तिचा मृतदेह आढळून आला. या ठिकाणी तिच्या फुटलेल्या बांगड्या आणि तिच्या अंगावरील जखमा जमलेल्या लोकांना दिसून आल्या. शितलचा मृतदेह लागलीच शासकीय रुग्णालयात नेण्यात आला.

या घटनेची माहिती समजताच उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील नंदवाळकर, पोलीस निरीक्षक विकास देवरे आदींनी आपापल्या सहकाऱ्यांच्या मदतीने घटनास्थळ आणि रुग्णालय गाठले. या घटने प्रकरणी पारोबाई परशुराम घोगले हिच्या फिर्यादीवरुन तिची सून शितल घोगले हिच्या हत्येबाबत अज्ञात हल्लेखोराविरुद्ध प्राप्त माहितीच्या आधारे अमळनेर पोलीस स्टेशनला खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. गु. र. न. ४६१/२४ बी एन एस १०३ (१) प्रमाणे हा गुन्हा नोंद करण्यात आला.

या घटने पूर्वीचा सर्व घटनाक्रम पोलीस निरीक्षक विकास देवरे यांनी फिर्यादी पारोबाईकडून जाणून घेतला. तिने दिलेल्या माहितीच्या आधारे सकाळी नऊ वाजता मंगला आणि शितल या दोघी नणंद – भावजय शौचास सोबत गेल्या होत्या. मात्र येताना फक्त मंगला एकटीच आली होती. तिने तिच्या आईला सांगितले होते की वहिणी शितल जंगलातील लाकडे गोळा करुन घरी येत आहे. मात्र बराच वेळ झाला तरी शितल घरी आली नाही. त्यानंतर तिचा शोध घेतला असता ती काटेरी झुडपात मृतावस्थेत आढळून आली. त्यानंतर मंगलाची विचारपूस केली असता तिने सांगितले की मी शौचास जाऊन घरी दहा मिनिटात आली. मात्र परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली असता ती तब्बल अर्धा तासाने घरी आल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांचा मंगलावर संशय बळावला. संशयाची सुई मंगलावर स्थिर होऊ लागली.

याच दरम्यान पोलिसांनी परिसरातून माहिती संकलित करण्यास सुरुवात केली. मंगला आणि करण यांचे गेल्या दोन ते तीन वर्षापासून प्रेमसंबंध सुरु असल्याची माहिती पोलीस निरीक्षक विकास देवरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना समजली. करण हा अमळनेर नगरपालिकेत सफाई कामगार होता. मयत शीतलची सासू पारोबाई ही देखील नगरपालिकेत सफाई कामगार होती. त्यामुळे करण हा तिच्याकडे गेल्या एक वर्षापासून येत होता. त्यातून त्याचे आणि मंगलाचे प्रेमसंबंध जुळून आले होते अशी माहिती पोलिसांना समजली. या प्रेमसंबंधाला मयत शितलचा विरोध होता. या प्रेमसंबंधामुळे मयत शितल आणि तिची नणंद मंगला यांच्यात वाद होत असत अशी देखील माहिती पोलीस निरीक्षक विकास देवरे यांना मिळाली. त्यामुळे संशयाची सुई करण याच्यावर देखील स्थिरावत गेली. त्यामुळे चौकशीकामी अगोदर त्याला ताब्यात घेण्यात आले.

पोलिसी खाक्या बघून करण याने आपल्या गुन्ह्याची कबुली दिली. मंगला हिने मला दोन ते तीन वेळा फोन करून गुन्हा करण्यासाठी बोलावले होते अशी कबुली त्याने दिली. लोखंडी सळईने आपण मंगलाच्या सांगण्यावरुन शितलला मारहाण केली असे त्याने कबूल केले. पारोबाईच्या जागेवर सफाई कामगार म्हणून तिची सून शितल ही लागणार होती अशी माहिती मंगलास समजली होती. मात्र आईच्या जागेवर मंगला हिला लागायचे होते. त्यामुळे मंगला आणि करण हे दोघे एकमेकांना खुलेआम भेटू शकणार होते. घटनेच्या दिवशी लोखंडी सळई मारल्यानंतर शितल खाली कोसळली. त्यानंतर आपण तिचा गळा दाबला, मंगलाने तिला जमिनीच्या दिशेने दाबून ठेवले होते असा घटनाक्रम करण याने पोलिसांना कथन केला. त्यानंतर पोलिसांच्या ताब्यातील मंगलाची चौकशी केली असता तिने देखील आपला गुन्हा कबुल केला. दोघांना अटक करण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विकास देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सहकारी पो. हे. कॉ. किशोर पाटील करत आहेत. या गुन्ह्याच्या तपासकामी पोलीस उपनिरीक्षक अक्षदा इंगळे, हेड कॉन्स्टेबल गणेश पाटील, संदेश पाटील, संतोष नागरे, पोलीस कॉन्स्टेबल अमोल पाटील, सिद्धांत शिसोदे आदींचे सहकार्य लाभत आहे.


पोहकॉ किशोर पाटील


पोलीस निरीक्षक विकास देवरे


पोकॉ. अमोल पाटील



# सवंदगाव येथे रस्त्याच्या वादातून सख्या भावांमध्ये हाणामारी–तिघे गंभीर जखमी

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील सवंदगाव येथे रस्त्याच्या वादावरून दोन सख्या भावांमध्ये हाणामारी झाली. या वादात तिघे गंभीर जखमी झाले असून, चार जणांना किरकोळ दुखापती झाल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, दोन्ही भावांमध्ये शेतातून रस्ता नेऊ नका या कारणावरून वाद उफाळला. वाद शांत होण्याऐवजी त्याने गंभीर स्वरूप धारण केले आणि दोन्ही गटात हाणामारी झाली.

या प्रकरणाची तक्रार सोनगाव येथील कदम कुटुंबियांनी वैजापूर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. जखमींवर वैजापूर उपजिल्हा



रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी घटनेचा तपास हाती घेतला असून, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. घटनास्थळी तणाव निर्माण होऊ नये म्हणून पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. पुढील कारवाईसाठी पोलिस तपास सुरू आहे. वैजापूर पोलिसांचे पथक परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवीत आहे.

# परसोडा ग्रामपंचायतीचे सरपंच बारसे बाबा व सदस्य निलेश परदेशी यांचा उद्धव ठाकरे गटात प्रवेश

**वैजापूर । प्रतिनिधी**

वैजापूर तालुक्यातील परसोडा ग्रामपंचायतीचे सरपंच बारसे बाबा आणि ग्रामपंचायत सदस्य निलेश परदेशी यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात अधिकृत प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्याला ठाकरे गटाचे स्थानिक आणि जिल्हा पातळीवरील अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

या प्रसंगी ठाकरे गटाचे उमेदवार डॉ. दिनेश परदेशी, जिल्हा परिषद सदस्य मनाजी पाटील मिसाळ, जिल्हा परिषद शिक्षण सभापती अविनाश पाटील गलांडे आणि वैजापूर तालुकाध्यक्ष सचिन पाटील वाणी यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमात



नवनिर्वाचित सदस्यांचे स्वागत करत स्थानिक राजकारणात त्यांच्या सहभागाचे कौतुक करण्यात आले.

सरपंच बारसे बाबा आणि निलेश परदेशी यांनी ठाकरे गटाच्या ध्येयधोरणांवर विश्वास व्यक्त करत, गावाच्या विकासासाठी समर्पित योगदान देण्याची ग्वाही दिली. या प्रवेशामुळे परसोडा ग्रामपंचायतीत ठाकरे गटाचा प्रभाव वाढणार असल्याचे बोलले जात आहे. ग्रामस्थ आणि कार्यकर्त्यांमध्ये या प्रवेश सोहळ्यामुळे उत्साहाचे वातावरण असून आगामी निवडणुकीत या गटाचा स्थानिक पातळीवरील प्रभाव वाढणार असल्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

# अखेर जरांगेंनी विधान सभा निवडणुकीचे रणशिंग फुंकले

## तुम्ही फॉर्म भरा,मी समीकरण जुळवतो-मनोज जरांगे पाटील

**जालना । प्रतिनिधी**

मनोज जरांगे पाटील यांनी रणशिंग फुंकले आहे. उपस्थित कार्यकर्त्यांसोबत बोलताना जरांगेंनी निवडणुकीत उतरवण्याचा प्लॅन सांगितला. समिकरण जुळवाजुळव सुरु असल्याचे जरांगे पाटील म्हणाले.आपण कुठं निवडून येऊ शकतो. दलीत मुस्लिम एकत्र आहे ते पाहुयात. मी समीकरण जुळवत आहे. तुम्ही फॉर्म भरून घ्या. फॉर्म मागे घ्यायच्या रोजी आपण सांगू. फॉर्म कुणाचा मागे घ्यायचा, असे मनोज जरांगे म्हणाले.

प्रत्येक मतदारसंघात १ लाख मतदान आहे. कुणाला लीड तुटते. पक्षा नेत्याकडून बोलू नका, समाजाकडून बोला. आंदोलन उघडे पडू देणार नाहीत हे सांगा. मला माझ्या समजासाठी आंदोलन करायचे आहे. मविआ आणि महायुती आरक्षण देतो म्हणत नाहीत. महायुती,मविआने अजून यादी जाहीर केली नाही. पण जर आपलं ठरले तर दोघांचा कार्यक्रम करायचा, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. मला एकटे पडू देऊ नका. जिथं निवडून येतील तिथं उभे करावे.एस.टी.च्या जागी उमेदवार देऊ नये. तिथं आपल्या विचारांच्या माणसाला मते देऊ. जिथं उभे करणार नाही पण जो आपल्याला जो ५०० बाँडवर लिहून देईल, त्याला मतदान देऊ, असे मनोज जरांगे पाटील म्हणाले. ज्याला आपली मागणी मान्य आहे जो आपल्या विचारांचा आहे त्याला मत द्यायला काय हरकत काय ?उभे करायचे की पडायचे? असा सवाल यावेळी मनोज जरांगे यांनी उपस्थित मराठ्यांना विचारला. यावेळी सर्वांनी एकच लढण्याचा निर्धार केला. माजी निवडणुकीकडे जायची इच्छा नाही, पण मी समाजाच्या पुढे नाही. समाजाचे जे म्हणणं ते माझं आहे, असे म्हणत जरांगे यांनीही खो दिला. आपण राजकारणात जाऊ नये, अशी माझं म्हणणं आहे. पण तुम्ही सर्वांनी पाडायचे की उभे राहायचे ठरवा. माझी इच्छा राजकारणात जायची इच्छा नाही.जर उभा करायचं ठरलं तर माझे प्रश्न



आहे. उभा करायच्या नादात माझ्या समाजाचा प्रश्न मागे राहील. राजकारण झाले तर माझा समज पुन्हा एकत्र राहील का? महावि आणि महायुतीवाले सगळे सख्खे मावस आहेत. आपण उभे राहिले की भाजप वाले खुश होतील. आणि उभे नाही केले तर माहाविकास आघाडी वाले खुश होतील, असे जरांगे म्हणाले. आपल्या हाताने आपण संपू नये म्हणून वेगळा मार्ग काढला पाहिजे. आपण गाफील राहिलो तर अवघड आहे, असेही जरांगे म्हणाले.

आपले लोकं म्हणतात पटकन निर्णय घ्या. मग आपण १३ महिने काय केले? फॉर्म भरायला वेळ आहे. चिन्ह मिळायला वेळ आहे. मग प्रचार कसा करायचं? गडबड कशाला करायची. आपल्याला जे चिन्ह मिळाले ते दोनच तासात राज्यात जाईल. चिन्हाचा लोड नाही. प्रचाराचा गरज नाही. जरी लोकांनी उमेदवाराचे तोंड नाही पाहिले तर मतदान करा. तुमचे त्यांनी काम केले नाही तर मी आहे त्यांच्याकडे बघायला. राजकारणाचा इतका नाद लागू देऊ. आपला समाजाने लय संघर्ष केला आहे. समजासोमोर संकट उभे केले आहे.८०% पेक्षा जास्त मतदान एक शिक्का चालणार आहे. मतदार याद्या चाळा, गावतील नसलेले मतदान शोधून काढा. आपल्याला मतदान एजंट गरज नाही. अख्खा गावच एजंट आहे. उमेदवार गडबड करत आहेत, लवकर डिक्लेर करा म्हणत आहेत का? तर तयारी करायची आहे. आपण १३ महिने काय केल? तयारी केलीच आहे. चिन्ह माहिती नाही गावोगाव जाऊन काय सांगणार? आपण उमेदवार, चिन्ह सांगितल्यावर दोन घंट्यात हे चिन्ह जगात माहित होणार आहे, चिंता करू नका. गरजवंत मराठे यांना गडबड नाही, ते २० नोव्हेंबरला शांत डोक्याने मतदान करतील, असे मनोज जरांगे म्हणाले. आपल्याला संपवण्याचा विडा उचलणाऱ्यांना संपवायचं म्हणजे संपवायचे. इथून पुढच्या काळात प्रत्येकाला वाटलं पाहिजे की मराठ्यांना संपवायला जाणाऱ्यांना संपाव लागते, असा इशारा जरांगेंनी दिला.

# शिक्षणाची तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालय येथे बालविवाह प्रतिबंधक कार्यशाळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालय येथे आज बालविवाह प्रतिबंधक कार्यशाळा संपन्न झाली . या कार्यशाळेला सोनिया हांगे या उपस्थित होत्या .बालविवाह करू नये यासाठी गुरुकुलातील विद्यार्थ्यांनी आपापल्या पालकांना पत्र लिहिले होते तसेच बालविवाह प्रतिबंधक या विषयावर निबंध लेखन , चित्र काढले होते ते आज मॅडमने प्रत्यक्ष बघितले .मुलांचे कौतुक केले . मुलांशी ग संवाद साधला त्यांच्या प्रश्नाची उत्तरे दिली . काही मुलांना घरी कॉल लावून दिले .

आपल्या बहिणीला मुक्तपणे फिरता येते ? त्यांना खेळायला दिले जाते ? का दिले जात नाही याबद्दल चर्चा केली . योगायोगाने आज सानप पालक आपल्या मुलाला भेटण्यासाठी मुलीसह आले होते . दोघांशी चर्चा मॅडमनी केली .कार्यशाळेचे उद्घाटन संस्थापक अध्यक्ष . दत्ता नलावडे सर यांनी केले .एकूणच बालविवाह प्रतिबंधक या विषयावर जनजागृती या निमित्ताने झाली .



# संभाजीराव बडगिरे विद्यालय येथे कायदेविषयक शिबीर संपन्न



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यातील ममदापुर(पा.) येथील संभाजीराव बडगिरे माध्यमिक विद्यालय येथे तालुका विधी सेवा समिती व वकील संघ अंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने मा.उच्च न्यायालयाचे सूचनेनुसार मोबाईल व्हॅन कार्यक्रमा अंतर्गत कायदेविषयक शिबीर(विधी साक्षरता शिबीर) घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परेश वाघडोळे, दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,अंबाजोगाई हे होते. प्रमुख उपस्थिती म्हणून सचिन मेहता, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व बालविर गोडबोले, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर हे होते. यावेळी अँड.सारंग मुंडे यांनी राष्ट्रीय बालिका दिवस या विषयावर मार्गदर्शन करताना म्हणाले की,मुलींनी शिक्षण घेऊन मोठे झाले पाहिजे व आपणही मुलापेक्षा कमी नाहीत हे दाखवून दिले पाहिजे नाही तर मुलींना मोलमजुरी करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. तसेच अँड.कौशल्या गडदे यांनी महिला सुरक्षेसंबंधी जनजागृती या विषयावर महिला साठी असलेल्या कायद्याबाबत व महिलांनी सक्षम होण्यासाठी शिक्षण घेऊन त्यांच्या सुरक्षेसाठी असलेल्या कायद्याचा योग्य वापर करून घ्यावा असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना विद्यार्थी व विध्यार्थीनिना मार्गदर्शन करताना परेश वाघडोळे ,दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,अंबाजोगाई म्हणाले की, विद्यार्थिनींनी आपल्या सोबत काही अन्याय/अत्याचार होत असेल तर कोणताही संकोच न बाळगता तात्काळ आपण आपल्या गुरुजनांना व आईवडिलांना सांगावे ज्यामुळे मोठा अनर्थ होणे टळेल. तसेच सर्वांनी शिक्षण घेऊन विविध क्षेत्रात नाव लौकिक मिळवावा असे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक वकील संघाचे उपाध्यक्ष अँड.माणिक आदमाने यांनी केले.यावेळी व्यासपीठावर अंबाजोगाई वकील संघाचे अध्यक्ष अँड.जयंत भारजकर, सचिव अँड.सचिन शेप, सहसचिव अँड.शहाजान पठाण, माजी सरकारी अँड.अशोक कुलकर्णी, मुख्याध्यापक प्रकाश मठपती हे होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सत्यनारायण सोमवंशी यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. एकनाथ हरदास यांनी केले.यावेळी ममदापूर येथील ग्रामसेवक, सरपंच, तलाठी व ग्रामस्थ उपस्थित होते.सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संभाजीराव बडगिरे विद्यालयाचे शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.


# सौ.के.एस.के.महाविद्यालयात आकाश कंदील बनविणे कार्यशाळा

**बीड । प्रतिनिधी**

बालरंगभूमी परिषद शाखा बीड व सौ.के.एस.के.महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनानुसार आकाश कंदील बनविण्याची एक दिवशीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये बीड शहर व परिसरातील एकूण १६ शाळांच्या विद्यार्थ्यांनी सक्रीय सहभाग नोंदवला होता. या कार्यशाळेच्या प्रशिक्षणासाठी कैलास कला निकेतन बीड येथील तज्ञ ११ प्रशिक्षकांनी सहभागी ८० विद्यार्थ्यांना व सौ.के.एस.के.महाविद्यालयातील कमवा व शिका योजनेचे ३३ विद्यार्थी असे एकूण ११३ सहभागी विद्यार्थ्यांना आकाश कंदील बनविण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. इको फ्रेंडली आकाश कंदील बनविण्याचे तंत्र व कसब या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना शिकविण्यात आले.

या कार्यक्रमाच्या वेळी बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष प्राचार्य डॉ.दीपा क्षीरसागर म्हणाल्या की, बालवयामध्ये विद्यार्थ्यांच्या अंगी कला कौशल्य विकसीत होणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून बालरंगभूमी परिषद सातत्याने विद्यार्थ्यांना जीवनात उपयोगी होतील असे उपक्रम राबवत आहे. आणि या उपक्रमांसाठी शाळेतील विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग होतो.

वेगवेगळ्या आकाराचे व उत्कृष्ट रंगसंगतीचे आकाश कंदील विद्यार्थ्यांनी या वेळी तयार केले. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना बालरंगभूमीच्या वतीने



आवश्यक ती सामग्री देण्यात आली होती. सहभागी विद्यार्थ्यांनी अत्यंत कलात्मक पध्दतीने आकर्षक आकाश कंदीलांची निर्मिती केली. या कार्यशाळेसाठी प्रशिक्षक म्हणून अजय कांबळे,गोविंद राठोड,शरद गाढवे,संकेत पवार, नानाभाऊ मसवले, अजय पवार, करण राठोड,श्रध्दा देवडकर,प्रियानी गोरे,नम्रता बारस्कर, कृष्णा शेवंतकर आदी होते.

या कार्यशाळेसाठी उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर,पदव्युत्तर संचालक डॉ.खान ए.एस. यांची उपस्थिाती होती. तर प्राध्यापक दीपक जमधाडे, प्रा.सुरेश थोरात,प्रा.इंद्रजीत भांगे, डॉ.राजकुमार राख यांनी विद्यार्थ्यांना प्रशिक्षणा दरम्याने सहकार्य केले.प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी तयार केलेले आकर्षक आकाश कंदील यांचे सादरीकरण करण्यात आले.

# सुरेश धस यांच्या विजयासाठी पुण्यातील आष्टीकर एकवटले

**पाटोदा (प्रतिनिधी)**–आष्टी तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न घेऊन आपण राजकारणात आलो सरपंच मनापासून जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे लक्ष देऊन दर्जेदार शिक्षण घेण्याचा प्रयत्न केल्यामुळे तात्कालीन पहिली ते सातवीतील असलेले विद्यार्थी आज पुणे जिल्ह्यामध्ये विविध क्षेत्रात स्थिरावले आहेत याचा आपणास अभिमान वाटत असून त्यांच्यासाठी काही करता आले याची समाधान वाटत आहे असे प्रतिपादन माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी केले. आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील मूळ रहिवासी असलेल्या पुणे जिल्ह्यातील नागरिकांच्या वाकड, हडपसर आणि रांजणगाव येथे आयोजित कौटुंबिक स्नेह मेळाव्यामध्ये ते बोलत होते.



पुढे बोलताना धस म्हणाले की,पुणे जिल्ह्यातील विविध क्षेत्रात आपल्याकडील लोक कार्यरत आहेत आयटी क्षेत्रात असतील व्यावसायिक क्षेत्रात असतील ड्रायव्हर क्षेत्रात देखील आपल्या भागातील मुले बहुसंख्येने आहेत जे की स्वतःची वाहने घेऊन या क्षेत्रात आलेली आहेत १९९९ पासून आज पर्यंत गोरगरिबांची शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत असलेल्या घेत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाद्वारे दर्जेदार मिळावे यासाठी शैक्षणिक कार्यावर भर देत आलेलो आहे ज्यावेळेस मी पहिल्यांदा जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष झालो त्यावेळेस शिक्षकांचा तुटवडा आणि असलेल्या रिक्त जागा मला जाणवत होत्या त्यात तात्काळ भरण्यासाठी मी जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष असल्याने तत्कालीन जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी मला या निर्णयासाठी सर्वाधिकार दिले आणि त्यावेळेस एक हजार शिक्षकांची मेगा भरती करण्याचे काम पहिल्यांदा मी केलं २००१ ते २००५ पर्यंत ही रमणी पॅटर्न लागू केला ३० टक्के गुणवत्ता असलेल्या शाळा त्या २००5 साली ६८.६०% पर्यंत गेल्या आणि याच कालावधीमध्ये असलेले पहिले ते सातवी वर्गातील मुलं आज आपल्याला पुणे जिल्ह्यात विविध क्षेत्रात काम करताना दिसत आहेत माझ्या मतदारसंघातील जरेवाडी ची ३० विद्यार्थी पटसंख्या असलेली शाळा आज १३०० विद्यार्थ्यांची झालेली आहे आज त्या शाळेत विद्यार्थ्याला प्रवेश घ्यायचा असेल तर त्याला वेटिंग आहे शिवाय कोतन येथील शाळा देखील त्याच धर्तीवर मार्गक्रमण करत आहे त्या ठिकाणचे मिसाळ नावाचे शिक्षक तर जरेवाडी चे संदीप पवार हे शिक्षक गुणवत्ता वाढीचे प्रामाणिकपणे काम करत आहेत अशा शिक्षकांची आज प्रामुख्याने गरज आहे माझ्या कार्यकाळात जिल्हा परिषद शाळेच्या खुल्या असतील अंगणवाडी खुले असतील त्याला भरघोस निधी उपलब्ध करून देण्याचे काम मी प्रामाणिक केले मात्र २०१४ ते २०१९ आणि २०१९ ते २०२४ या दहा वर्षाच्या कार्यकाळात दोन लोकप्रतिनिधी यांच्या कार्यकाळात ७८४ शाळा खोल्या या कमी असून ४५० ते ५०० अंगणवाड्या खोल्या देखील उपलब्ध करून शकले नाहीत हे विदारक चित्र आज मतदारसंघाचे आहे. यावेळी नगरसेवक शांताराम भालेकर, हिंजवडीचे सरपंच दत्ता साखरे, माझी सभापती सुरेश हुळवले, मल्हारी साखरे, कासार साई चे सरपंच ललित शिंदे नगरसेवक गोपाळ माळेकर,नगरसेवक बाबा त्रिभुवन माजी सभापती प्रमिलाताई सगळे, उद्योजक बंडूशेठ तोडकर उद्योजक शहादेव चौधरी, सतीश कंठाळे, बापू तांबे,कुमार कोकणे, गणेश कदम, दीपक गुंड, राजू वलवळे, अनिल टेकाळे, सोमीनाथ मंडलिक, बापू तांबे,स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे ऊसतोड मुकादम संघटनेचे अध्यक्ष सुखदेव सानप, हडपसर नगरसेविका उज्वला जंगले,सुभाष जंगले,सोमनाथ जराड या कार्यक्रमाचे नियोजन उद्योजक अनिल टेकाळे, राजेंद्रजी वलवळे,विनोद शिंदे,दीपक गुंड,कुमार कोकने,शकर जरांगे,कृष्णा बांगर,राजू चखाले,चिंचोली सरपंच मारुती सांगळे, गणपत जगताप,हिरामण बुचुडे,युवा नेते जय साखरे,विकास एकशिंगे,गणेश कदम,सर्जेराव कचरे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# वंचित बहुजन आघाडी धारूर तालुका आयोजित कार्यकर्ता मेळावा संपन्न

**धारूर । प्रतिनिधी**

वंचित बहुजन आघाडी माजलगाव मतदार संघाचे अधिकृत उमेदवार शेख मंजुर यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा धारूर शहरातील आर्या फंक्शन हॉल येथे संपन्न झाला.

दलित-मुस्लिम-आदिवासी-ओबीसी समूहामध्ये शेख मंजुर यांच्या उमेदवारीने अतिशय उत्साहाच वातावरण तालुक्यामध्ये निर्माण झालेले आहेत. या बैठकीत प्रास्ताविक रानबा उजगरे यांनी केले. तालुकाध्यक्ष इंजि. प्रशांत उघडे यांनी बोलताना सांगितले पक्षाने दिलेला उमेदवार शेख मंजुर असुन तो सर्व बाळासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्त्यांना मंजुर आहे. येणार्या विधानसभेच्या निवडणुकीत मोठ्या ताकदीने शेख मंजुर यांच्या पाठीमागे उभा राहण्याचे आश्वासन दिले.



वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शेख मंजुर यानी माजलगाव मध्ये नगर परिषदेचे नगराध्यक्ष असताना विविध कल्याणकारी योजना राबवून केलेल्या विकास कामांची माहिती दिली. येणाऱ्या विधानसभेच्या अनुषंगाने माजलगाव मतदार संघातील धारूर तालुक्यातील घाट रुंदीकरणाचा प्रश्न असेल धारूर शहरातील पाणीपुरवठ्याची योजना असेल प्रभावी राबवण्याचे धारूरकरांना आणि तालुक्यातील जनतेला आश्वासन दिले. येणाऱ्या काळामध्ये धारूर तालुक्यातील उद्योगधंद्यांचा प्रश्न असेल सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न असेल विद्यार्थ्यांचा प्रश्न असेल अशा अनेक प्रश्नांना घेऊन आपण जर मला संधी दिली तर नक्कीच याची पूर्तता करण्याचे आश्वासन शेख मंजूर भाई यांनी बोलताना दिले. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष भारत तांगडे, सचिन उजगरे वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल भैय्या डोंगरे युवक जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के, माजलगाव तालुका अध्यक्ष संजय नाकलगावकर वडवणी तालुकाध्यक्ष अविनाश झोडगे समाधान गायकवाड, धम्मानंद साळवे धारूर तालुक्याचे महासचिव अभिजीत वाव्हळ, अमोल बनसोडे बाळासाहेब उजगरे शहराध्यक्ष आकाश गायसमुद्रे, तसेच धारूर तालुक्यातील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार प्रदर्शन अभिजीत वाव्हळ यांनी केले.

# समाजातील छोट्या समुहाला प्रतीनिधित्व देणारे बाळासाहेब आंबेडकर

**पाथरी । प्रतिनिधी**

लोकशाहीत प्रत्येक समुहाला प्रतीनिधित्वाची संधी मिळणे आवश्यक असले तरीही, आजच्या काळात ती मिळवणे कठीण झाले आहे. परंतु बाळासाहेब आंबेडकर हे एकमात्र नेते आहेत, जे वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून समाजातील सर्वात छोट्या समुहाला प्रतीनिधित्वाची संधी देत आहेत. असे ठाम मत वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा निरिक्षक गोविंद दळवी यांनी पाथरी तालुक्यातील मौजे हदगाव बु. येथे बुध्द आणि त्यांचा धम्म या ग्रंथाच्या सांगता समारंभात व्यक्त केले.



पाथरी तालुक्यातील मौजे हदगाव बु. येथे गेल्या तीन महिन्यांपासून 'बुध्द आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन सुरू होते. या ग्रंथाचा सांगता समारंभ १७ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११:३० वाजता आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमादरम्यान गावातील प्रमुख रस्त्यांनी धम्म रॅली काढण्यात आली. नंतर गावातील माता रमाई सभागृह हदगाव बु. येथे मुख्य कार्यक्रमाला सुरुवात झाली.गोविंद दळवी पुढे म्हणाले, तथागत भगवान बुध्द व त्यांचा धम्म जगाला शांती आणि सद्भावनेची शिकवण देत आहेत. आपण बुध्दाच्या शिकवणीचे अनुसरण केले पाहिजे, ज्यामुळे आपली सामाजिक, वैचारीक, आर्थिक व शैक्षणिक प्रगती होईल. त्याचप्रमाणे राजकीय प्रगती सुद्धा आवश्यक आहे.या प्रसंगी भंते पी धम्मानंदजी, कार्यक्रमाचे अध्यक्ष व भारतीय बौद्ध महासभेचे माजी तालुका अध्यक्ष टि.एम. शेळके, जेष्ठ नेते प्रकाश उजागरे, टि.डी. रुमाले, भारतीय बौद्ध महासभेच्या केंद्रीय शिक्षिका अनिताखंदारे, केंद्रीय शिक्षक के.वाय. दवंडे, बौद्धाचार्य दादाराव ब्रम्हराक्षे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात गेल्या तीन महिन्यांपासून 'बुध्द आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाचे वाचन करणारे प्रकाश नरवडे यांचा त्यांच्या पत्नीसमवेत सत्कार करण्यात आला. तसेच गावातील बालकांना मोफत शिकवणी देणारे सचिन साळवे व दिव्या कदम यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक दिलीप मोरे यांनी केले, तर सूत्रसंचलन बौद्धाचार्य शुद्धोधन शिंदे यांनी केले. आभार ग्रंथ वाचक प्रकाश नरवडे यांनी मानले. सदरील कार्यक्रम संपन्न करण्यासाठी सत्यभामाबाई नरवडे, लताबाई भदर्गे, चंद्रकलाबाई गनकवार, सुनिता साळवे, रुकमीनबाई ढवळे, सत्यभामाबाई मुधावने, आशामती वाव्हळे, मिलिंद खरात, आशोक नरवडे, प्रकाश नरवडे, लक्ष्मण कदम, बळीराम कदम, बि.टी. कदम, दलीत नरवडे सह समस्त गावकरी मंडळी यांनी परिश्रम घेतले.

# २२ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध पत्रकार वक्ते उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे आयोजन

## जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांचे पखवाज वादन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने प्रसिद्ध पत्रकार तथा अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांच्या व्याख्यानाचे व जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांच्या मंगलमय पखवाज वादनाचे आयोजन दि.२२ ऑक्टोबर रोजी करण्यात आले आहे. अशी माहिती देवून या कार्यक्रमास अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.



स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेले अंबाजोगाईतील वैभवशाली ग्रंथालय साहित्य निकेतनने नुकतेच ८० व्या वर्षांत पदार्पण केले आहे. त्यानिमित्त समाजामध्ये पुस्तक प्रेम वृद्धिंगत व्हावे, समाजातील सांस्कृतिक व चिंतनशील विचारांची देवाण - घेवाण वाढावी या हेतूने साहित्य निकेतन ग्रंथालय आपल्या परीने विशेष प्रयत्न करीत आहे. अशाच एक प्रयत्नांतून यावर्षी ऑगस्ट महिन्यात गीत रामायणाचे रचयिते व प्रख्यात साहित्यिक, कवी, गीतकार ग.दि.माडगूळकर यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेली रसाळ कृष्ण कथा गीत गोपालचा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला होता. त्याला अंबानगरीतील सुजाण नागरिक, रसिक श्रोत्यांनी भरभरून प्रतिसाद दिला होता. पुन्हा एकदा असाच एक वेगळा विषय घेऊन दि.२२ ऑक्टोबर मंगळवार रोजी आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई येथे दुपारी ४ वाजता जागतिक किर्तीचे पखवाज वादक उध्दवराव बापू आपेगांवकर यांचे मंगलमय पखवाज वादन सादर होणार आहे. त्यानंतर नामवंत पत्रकार व चिंतनशील अभ्यासू वक्ते उदय निरगुडकर यांचे मविकसित भारतातील महाराष्ट्राचे योगदानफ या विषयावरील व्याख्यान होणार आहे. उदय निरगुडकर यांनी मागील दोन दशकांहून अधिक काळ शिक्षण, पायाभूत सुविधा, व्यवस्थापन कौशल्य, आर्थिक क्षेत्र, आयटी उद्योग तसेच न्यूज मिडीया अशा अनेक ठिकाणी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाच्या पदांवर कार्य केले आहे. त्यांचा अनुभव व त्यातून त्यांनी केलेले चिंतन ऐकण्यासाठी आपण व आपले सर्व सहकारी यांनी व्याख्यानासाठी आवर्जून उपस्थित रहावे असे आवाहन साहित्य निकेतन ग्रंथालय, अंबाजोगाई यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# अंबाजोगाई शहरांसह परिसरात सोमवारी दुपारी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पाऊस



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

हवामान विभागानं वर्तविलेल्या अंदाजानुसार, अंबाजोगाई शहरांसह परिसरात सोमवारी दुपारी दिडच्या सुमारास विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह पावसानं हजेरी लावली. मागील काही दिवसांपासून प्रचंड उकाडा वाढल्याने नागरिक त्रस्त झाले होते.

हवामान विभागानं वर्तविलेल्या अंदाजानुसार,

सोमवारी दुपारीआलेल्या पावसामुळं वातावरणात गारवा निर्माण झाल्यानं नागरिकांची उकाड्यापासून सुटका झाली.दि. ऑक्टोबर सोमवार रोजी दुपारी दीड वाजायच्या सुमारास विजांच्या कडकडाटात अंबाजोगाई शहरांसह तालुक्यात पावसाने झोडपले. त्यामुळे नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली.

दरम्यान, हाती आलेल्या माहितीनुसार अंबाजोगाई तालुक्यातील अनेक भागात विजांच्या कडकडाटासह, वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली आहे. जोरदार पावसाने हजेरी लावल्यामुळे शहरातील वीज पुरवठा खंडित झाला होता. पावसामुळे शेतकऱ्यांचे भाजीपाला, शेतातील सोयाबीन याचे मोठे नुकसान झाले आहे, अशी माहिती मिळाली आहे.सायंकाळ पर्यंत दिवसभर ढगाळ वातावरण पसरले होते.

# काँग्रेस पक्षाला मतपत्रिकेवर येऊ द्या अन्यथा जिल्हात पक्ष गोठेल : अन्यथा राजीनामासत्र

**केज । प्रतिनिधी**

काँग्रेस पक्ष्याच्या सन्मानासाठी केज मतदार संघातून उमेदवारी लढवणारच -- दत्ता कांबळे

विधानसभा निवडणुकीच्या पार्शश्वभुमीवर भारतीय काँग्रेस पक्षाचे अनु. जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी जिल्हातील काँग्रेस पक्ष जिवंत ठेवण्यासाठी पक्षश्रेष्ठिला भावनिक हाक दिली आहे.




जिल्हायातील काँग्रेस पक्ष जिवंत राहण्यासाठी काँग्रेस पक्षश्रेष्टीने जिल्ह्यातील किमान तीन मतदार संघावर दावा केला होता, परंतु आघाडी धर्मात जुळून घेण्यासाठी किमान परळी आणि केज हे दोन मतदार संघ सोडून घ्यावेत असा आग्रह होता.परंतु आघाडी मध्ये काँग्रेस ला जिल्ह्यातील एकाही मतदार संघात काँग्रेस पक्षाला जागा मिळत नसेल तर, जिल्ह्यातील भारतीय काँग्रेस पक्ष मतपत्रिकेवर आलाच नाही तर पक्ष आणि पक्षाच्या संघटनेशी जुडलेला कार्यकर्ते जिवंत राहणार नाहीत, परिणामी जिल्ह्यातील पक्ष संघटना गोठेल याची दक्षता पक्ष श्रेष्ठीने घ्यावी अशी भावनिक हाक पक्षाचे अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे पक्षश्रेष्ठिकडे केले आहे.

तसेच सद्या काँग्रेस मधील डझन भर कार्यकर्त्यांनी पक्ष श्रेष्टीकडे आपल्याकडे असणाऱ्या पदाचा व पक्ष्याच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामे देण्याच्या हालचाली सुरु केल्या असून, केज किंवा परळी मतदार संघात काँग्रेस पक्षाला उमेदवारी मिळाली नाही तर जिल्हाभरतील काँग्रेस कार्यकर्ते सांगली पॅटर्न राबून काँग्रेस जिवंत ठेवण्यासाठी प्रयत्न करतील याची नोंद पक्ष श्रेष्ठी व महाविकास आघाडी यांनी घ्यावी असा इशारा ही अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे इशारा दिला आहे. तसेच काँग्रेस पक्षाच्या जिल्ह्यातील प्रत्येक कार्यकर्त्यांनी आपला स्वाभिमान आबादित ठेवण्यासाठी उमेदवारी अर्ज भरून उमेदवारी लढवण्याचं आव्हान करत, आपण स्वतः केज विधानसभा मतदार संघातून उमेदवारी अर्ज भरून पक्षाच्या सन्मानासाठी उमेदवारी लढवणारच असा इशारा काँग्रेस अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

# पत्र्याच्या शेड मधील कापसाला मध्य रात्रीनंतर आग लागून लाखाचे नुकसान

**धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील चौंडी येथे मध्यरात्रीनंतर आग लागल्याने एक शेतकरी एक लाख रुपयांचे नुकसान भोगला आहे. कापसाची वेचणी करून घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये साठवलेल्या २५ क्विंटल कापसाला शनिवारी (दि. १९) मध्यरात्री दोनच्या सुमारास आग लागली.



चौंडी येथील भीमा यंका मुंडे कुटुंबासह शेतात वास्तव्य करतात. सध्या कापूस वेचणी चालू असल्याने त्यांनी कापसाची गंजी घराशेजारील पत्र्याच्या शेडमध्ये बंद खोलीत ठेवली होती. शनिवारी रात्री पाऊस आल्याने मुंडे कुटुंबीय घरात जाण्यासाठी उठले असता, पत्र्याच्या शेड मधून धूर निघत असल्याचे त्यांना जाणवले. सावधानता राखत त्यांनी तातडीने आग लागलेल्या कापसाच्या गंजी मधील अर्धा कापूस वेगळा केला, त्यामुळे १५ क्विंटल कापूस राख होण्यापासून वाचला.

तथापि, जवळपास १२ ते १३ क्विंटल कापसाचे जळून राख झाले, ज्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले. या शेतकऱ्यास तातडीने शासनाकडून मदत मिळावी अशी मागणी केली जात आहे. घटनास्थळी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी रविवारी येऊन पाहणी करत पंचनामा केला.विशेष म्हणजे, पत्र्याच्या शेडमध्ये लाईटचे कनेक्शन नाही. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना अधिक सुरक्षा आणि संरक्षण आवश्यक आहे.

# महायुतीकडुन माजलगांव मतदारसंघात धनगर जमातीच्या माधवराव निर्मळ यांना उमेदवारी द्यावी-शिवदास बिडगर

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

माजलगाव मतदारसंघात धनगर जमातीच्या माधवराव निर्मळ यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी शिवदास बिडगर यांनी केली आहे. बीड जिल्ह्यात धनगर जमातीचे ३ लाख पेक्षा जास्त मतदान आहे. मागील झाले लोकसभा निवडणूकित महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ माधवराव निर्मळ बीड जिल्ह्यात धनगर जमात समाज बांधवाना एकजूट करून मोठी मतधिकय दिले होते. माधवराव निर्मळ हे नेहमीच महायुतीसाठी जीवाचे रान करणारे नेतृत्व आहेत. त्यांना माजलगाव मतदारसंघात त्यांना महायुतीने उमेदवारी द्यावी अशी मागणी बिडगर यांनी दिली.



विधानसभा सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाली असून माजलगाव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक माधवराव निर्मळ हे सामान्य कुटुंबातील व्यक्ती असून अत्यंत मेहनतीतून, कष्टातून आणि परिश्रमातून ते उभे राहिलेले आहेत.आज एक यशस्वी उद्योजक म्हणून त्यांची राज्यभर प्रतिमा आहे.अशा यशस्वी उद्योजकाच्या पाठीशी उभे राहून या मतदार संघाचा विकास करण्याची भूमिका या मतदारसंघातील मतदारांनी घेतली आहे. मतदारसंघातून समाजसेवक माधव निर्मळ यांनी जनमानसात आपले वलय निर्माण केले आहे. माजलगावात निर्मळ यांनी निवडून येतील एवढी ताकद या ठिकाणी उभी केली आहे. माजलगांव मतदारसंघात धनगर जमातीचे मतदान मोठ्या प्रमाणत असल्यामुळे माधवराव निर्मळ यांना उमेदवारी देण्यात यावी. सर्वसामान्य जनतेच्या मनातील जीवाभावाचे आमदार म्हणून ओळख निर्माण केली आहे. सर्वसामान्य गोरगरीब माणसांपासून ते सधन लोकांपर्यंत सर्वांना त्यांचा चांगला परिचय आहे. प्रत्येकाच्या सुख दुःखात धावून जाण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे त्यांनी अनेकांच्या मनात मानाचे स्थान मिळवले आहे. त्यांचे प्रत्येक पक्ष व कार्यकर्त्यांशी चांगले संबंध आहेत. अनेकांचे विविध प्रश्न फक्त फोन करून मार्गी लावतात. बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार झाले तर निश्चितपणे माजलगाव मतदार संघाचा कायापालट होण्यास वेळ लागणार नाही. चांगले काम करण्याची धमक त्यांच्यात आहे. यामुळे माधवराव निर्मळ सारख्या उमद्या व्यक्तिमत्वालाच महायुतीकडून उमेदवारी द्यावी अशी मागणी परळीतील धनगर जमातीचे युवा नेते शिवदास बिडगर यांनी केली आहे.

# शिवनेरभूषण आणि शिक्षणमहर्षी तात्यासाहेब गुंजाळ स्मृती पुरस्कार सामाजिक कार्यकर्त्यांना प्रदान



**जुन्नर । प्रतिनिधी**

जुन्नर येथील आयोजित कार्यक्रमात शिवनेरभूषण, शिक्षणमहर्षी स्व. तात्यासाहेब गुंजाळ स्मृती पुरस्कार सामाजिक कार्यकर्ते स्व. विष्णू पाटीलबा शिंदे (आप्पा) यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्कार वितरण कार्यक्रमात प्रसिद्ध साहित्यिक आणि व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांनी आमचे भविष्य आमच्या हाती या विषयावर विचार व्यक्त केले. डॉ. कळमकर म्हणाले, आयुष्यात संकट आणि संधी दोन्ही येतात, परंतु संकटावर मात करून संधीचे सोनं करणे महत्त्वाचे आहे. आपल्यातील कार्याची आणि कर्तुत्वाची जाणीव संकटे किंवा संधी आल्यावर होते. विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर आलेल्या संधींचा योग्य लाभ घेण्याचा सल्ला.